# कृष्णार्पणमस्तु

KRISHANARPANMASTU Title-Code: MAHMAR52590

Volume : 1 | Issue : 3 | Marathi Monthly | Thane, Saturday , 1 September to 30 September-2023 | Pages 16 | Price : 10/-


# परब्रह्माचा अद्वितीय साक्षात्कार असलेल्या कोकणात, विनाशकारी प्रकल्प नकोच!

**स्वातंत्र्याच्या अमृतकाळात 'अनंताकडून अनंता'कडे प्रवास घडवणारा कोकणी-निसर्गसुंदरतेचा 'अमृतपथ' सोडून... तथाकथित विकास-प्रकल्पांच्या 'विनाशकारीपथा'वर, क्षणभंगुरतेच्या अटळ प्राक्तनाचा भाळी टिळा लावून आलेल्या, या कुठल्या प्रवासासाठी आपण निघालोय...???**




बारसू-सोलगाव तेलशुद्धीकरण-प्रकल्प कोकणावर लादत... 'तमसो ऽ मा ज्योतिर्गमय' किंवा 'अहम् ब्रह्मास्मि' तसेच 'अवघे विश्वचि माझे घर', हा 'भारतीय-अध्यात्मा'चा महन्मंगल वैश्विक-पाया, एकीकडे लाथाडायचा आणि दुसरीकडे अयोध्येतल्या राममंदिरासारखी 'हिंदुत्वा'ची बुजगावणी उभारण्याची नौटंकी करायची?

आपण भारतीय लोक खरंतरं, ईश्वराचा शोध घेणारे कमी आणि मुमुक्षूवृत्तीने 'मोक्षा'सारख्या अवकाशव्यापी, आकाशगामी संकल्पनेसाठी धडपडणारेच जास्त असताना... 'बारसू-सोलगाव तेलशुद्धीकरण-प्रकल्पा'सारख्या विनाशकारी प्रकल्पांची कास धरत, अंति 'कपाळमोक्ष' करुन घेण्यात 'हिंदुत्वा'ची धन्यता मानणार आहोत? ...*(पान क्र. ५ वर)*




**विध्वंसक जैतापूर-अणुप्रकल्पाचा 'शिमगा' एकदाचा संपला, असं वाटत असतानाच... व्यवस्थेकरवी, बारसू-सोलगाव तेलशुद्धीकरण-प्रकल्पाच्या विकृत 'बालेनृत्या'चा निसर्गसुंदर कोकणाच्या छाताडावर घाट घालण्याचं निम्मित्त साधून... जैतापूर-अणुप्रकल्पाची 'हाळी'... फडणवीस-शिंदे-राणे या 'कोकण-घातकी त्रिकूटा'कडून नव्याने दिली जाऊ लागल्याने... त्यांची, कोकण-विध्वंसक 'दशावतारी नाटकं' उधळून लावण्याकाची, 'माझ्या जुन्या जाज्वल्य लेखांची 'साकडं' कोकणी जनता-जनार्दनासमोर पुन्हा एकवार घालून, 'कोकणी-निसर्गाचं कोण करु पहातंय वाकडं', हे पहाणं व निसर्ग-पर्यावरण उध्वस्त करु पहाणाऱ्या 'निर्मम-शोषक' व्यवस्थेचं यथाशक्ति 'वस्त्रहरण' केलं जाणं, अगत्याचं ठरावं...!!!**

**'लोकप्रभातील १ एप्रिल-२०११ च्या अंकातील 'राजू परूळेकर यांच्या 'जैतापूरची अणूगोळी' या लेखावर अत्यंत घणाघाती प्रतिक्रिया'शिमगा आणि जैतापूर' या शीर्षकाच्या एप्रिलच्या अंकातून देणाऱ्या डॉ. मिलिंद कुलकर्णी यांना सडेतोड उत्तर !!!**

# कोकणातल्याच एका खेड्यातली ही एक रूपक कथा ही प्रचलित लोककथा वीजेशीच संबंधित असल्यानं, जैतापूर प्रकल्पासंदर्भात चांगलीच प्रत्ययकारी ठरावी!

''एका गावाच्या मध्यभागी वडाच्या पाराखाली निवांत बसलेली गावकुत्री, अचानक गावकऱ्यांनी ढोलताशासह काढलेली मिरवणूक पाहून अचंबित होतात... त्यातला वयानं मोठा असलेला म्होरक्या कुत्रा कळपातल्या एका तरण्याबांड कुत्र्याला म्हणतो, ''जा बाबा बघून ये, कशासाठी गावकरी एवढे मिरवणुकीत आनंदानं नाचतायतं?'' तसा तो तरूण कुत्रा काय घडलं हे बघायला मिरवणुकीकडे धावत सुटतो आणि दुप्पट वेगानं परत येऊन अत्यानंदानं उड्या मारायला लागतो. तेव्हा तो म्होरक्या कुत्रा त्याला विचारतो, ''अरे लोकांच्या आनंदाचं कारण तुला तपासायला पाठवलं, तर तूच काय वेड्यासारख्या आनंदानं उड्या मारतोयस?''... तेव्हा तो तरूण कुत्रा म्हणतो, ''अहो आनंदाचं कारण काय विचारता? आपल्या गावात वीज येणार आहे, वीज! लोक त्यामुळे खूष असणारच, पण गावात वीज आली की, आपली सोय नाही का झाली? **अहो, वीज आली की, 'विजेचे खांब' नाही का येणार ?'' वरील लोककथेतल्या कुत्र्यांची जी क्षुद्र स्वार्थाची भावना आहे, तीच कोकणातल्या स्थानिक राजकारणी दलालांची! दोन-तीन लाख कोटींचा एवढा मोठा भांडवली खर्च असलेला जगातला आजवरचा सर्वात मोठा अणुप्रकल्प जैतापुरात येतोयं म्हटल्यावर वाचकहो सांगा, दलालीच आणि कंत्राटांचं केवढं पेव फुटेल? जैतापूर अणुऊर्जा प्रकल्पात मंत्री राजकारणी, शास्त्रज्ञ-नोकरशहा आणि एकूणच सरकारी यंत्रणेला एवढा प्रचंड रस का, याचं प्रमुख कारण समजून घेतलं की, पुढील गोष्टींचा आपोआप उलगडा होत जातो.**

"Capitalists have 'NO' nation!" व असं जे भांडवलदारांची स्वार्थी वृत्ती पाहून उद्वेगाने अमेरिकेचे भूतपूर्व अध्यक्ष व विचारवंत थॉमस जेफर्सन म्हणाले होते, त्यात आता भारतातल्या धंदेवाईक राजकारण्यांची, भ्रष्ट खाजगी सरकारी अधिकाऱ्यांची, तसेच फक्त आपल्या 'करिअर'कडे गिधाडासारखी नजर लावून बसलेल्या (आणि त्यापलीकडे दुनियेत माणुसकी किंवा भूतदया नावाची काही चीज असते, हे विसरलेल्या) विविध ज्ञान शाखांच्या तज्ज्ञ-शास्त्रज्ञ, अशा कितीतरी बुध्दिमंत बाळांची भर घालावी लागेल, एवढं भारतीय समाज जीवनाचं सध्या भयावह चित्र आहे! त्यामुळे जैतापूरसारख्या प्रकल्पांच्या मागचं खरं कारण हे 'देशभक्ती' किंवा 'देशहित' वगैरे नसून केवळ 'बाजारू अर्थकारण' हेच असतं... फार तर त्याला 'स्यूडो-पॅटिऑटिझम्' आपण म्हणू शकतो आणि अर्थातच अशा 'दशावतारी' देशभक्तीचा 'स्यूडो

## जैतापूरच्या शिमग्याचं कवित्व...




पॅटर्न' राबविणाऱ्या शास्त्रज्ञांना मग 'स्यूडो सायंटिस्टस्' नाही म्हणायचं, तर मग काय ?

**पृथ्वीमातेच्या तब्येतीची काळजी घेण्यासाठी... ज्यांची दृष्टी सदैव स्वहितापलीकडे. समष्टिच्या हिताकडे रोखलेली असेल, असे धोरणी, मुत्सद्दी-खरेखुरे लोकनायक आपल्याला शोधायला हवेत...**

अणुप्रकल्पाच्या गुणदोषांविषयी फक्त अणुशास्त्रज्ञांनीच लिहावं, असं फर्मान सोडणाऱ्या डॉक्टर मिलिंद कुलकर्णी यांनी स्वतः मात्र एखाद्या कसलेल्या शास्त्रज्ञाच्या अभिनिवेशात 'लोकप्रभा'त चांगलेच हातपाय ताणून घेतलेले दिसतात. कुलकर्णीसाहेब, एखाद्या डॉक्टरने रुग्णाला दिलेलं चुकीचं औषध फारतर त्या एखाद दुसऱ्या रूग्णाचा जीव घेईल आणि मृत्यूचा सिलसिला तिथेच थांबेल, पण डॉ. अनिल काकोडकरांसारख्याचा 'आण्विक अँटीबायोटिक्स्चा' जैतापूरसारखा 'हेवी डोस' तर सोडाच, पण साधा तारापूरसारखा 'माइल्ड डोस' जेव्हा कधी चुकेल (हे अघटित कधी ना कधी, कुठल्या ना कुठल्या स्वरूपात घडणे आहेच फक्त प्रश्न काळाचा आहे!) तेव्हा एखाददुसऱ्याचे नव्हे, एखाद-दोन हजाराचेही नव्हे, तर एक-दोन लाखापेक्षाही अधिक लोकांचे जीव धोक्यात येऊ शकतात आणि या धोक्याची तलवार अणुउत्सर्जनानं प्रभावित झालेल्या फार मोठया क्षेत्रात हजारो नव्हे, लाखो वर्षे टांगती राहू शकते!

बरं हे सारे भोग जे लोक भोगणार त्यातले कुणीही कधीही डॉ. अनिल काकोडकरांसारख्या शास्त्रज्ञांकडे, डॉ. मिलिंद कुलकर्णी म्हणतात त्याप्रमाणे, 'रूग्ण' (ऊर्जेनं कुपोषित) म्हणून सेवा मागण्यासाठी गेलेले नसणार, एवढं समजण्याएवढंही शहाणपण प्रकल्प समर्थकांकडे नसावं, हे कोकणाचं दुदैव आहे.

या देशातल्या शास्त्रज्ञांवर विश्वास ठेवायचा नाही का? असा प्रश्न करणाऱ्या डॉ. मिलिंद कुलकर्णींना आम्हाला सांगू द्या की.... ''एक समस्या सोडवताना, जे दुसरी समस्या निर्माण करतात. दुसरी सोडवताना तिसरी, अशी 'कापूस कोंड्या'च्या गोष्टी सारखी 'न' संपणारी समस्यांची शृंखला चढत्या भाजणीनं निर्माण करतात आणि अखेरच्या निर्माण झालेल्या अक्राळविक्राळ समस्येबाबत ज्यांच्याकडे कुठलाही इलाज नसतो, त्यांना पूर्वी (ज्ञानाच्या वेगवेगळया शाखांचे) 'शास्त्रज्ञ' म्हटले जायचे, पण हल्ली 'फुकुशिमा' आणि 'जैतापूर' च्या पाश्वभूमीवर, त्यांना 'अणुशास्त्रज्ञ' असं म्हणतात! आपल्या 'पृथ्वी' नावाच्या हिरवाई व सजीवसृष्टीच्या वैविध्यान विनटलेल्या एकमेवाद्वितीय ग्रहाची या तथाकथित शास्त्रज्ञांमुळे 'खेळ मांडियेला वाळवंटीकरणाचा अशी गंभीर अवस्था होऊ घातलीयं.

''We are into a dangerous world of various specialists.... without 'wisdom', powerful rulers.... without conscience' 'Nuclear-Giants... but 'Ethical-Dwarfs'!!!'' ...म्हणूनच फार उशीर होण्याअगोदर निदान आतातरी आपल्या रोगग्रस्त व्याधींनं जर्जर पृथ्वीमातेच्या तब्येतीची काळजी घेण्यासाठी.. ज्यांची दृष्टी सदैव स्वहितापलीकडे. समष्टिच्या हिताकडे रोखलेली असेल, असे धोरणी, मुत्सद्दी-खरेखुरे लोकनायक आपल्याला शोधायला हवेत... 'अणुकचऱ्या'सारखे टाकाऊ व अत्यंत घातक असलेले आजकालचे 'होलसोल' दळभद्री राजकारणी आणि काकोडकरांसारखे शास्त्रज्ञ नकोत!

**''कोकणात तुम्ही याल, पण तुम्हाला परत जाऊ देणार नाही'' ही एखाद्या गॅंगस्टरला साजेशी खुलेआम धमकी जेव्हा महाराष्ट्राचे उद्योगमंत्री (आणि कोकणचे महसूल मंत्री!) देतात तेव्हा ते हिटलरच्या वंशावळीतले वाटतात की, महात्मा गांधींचे गणगोत शोभतात, याचे एकदा डॉक्टरांनी 'निदान' केले तर बरे महाराष्ट्रात लोकमान्य टिळक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वा. सावरकर, प्रबोधनकार ठाकरे, अच्युतराव पटवर्धन, एस.एम. जोशी, सेनापती बापट, श्रीपाद डांगे यांसारख्या खऱ्याखुऱ्या समाजहितैषी राजकारण्यांची पिढी काळाच्या पडद्याआड गेल्यानंतर ज्याच्यावर निर्भेळ विश्वास टाकता येईल, असं एकही राजकीय नेतृत्व गेल्या ४०-५० वर्षांत महाराष्ट्रात उभं 'न' राहिल्यामुळे**

**जसा जनतेचा सर्वच राजकीय नेत्यांवरचा विश्वास पार उडालेला आहे, तव्दतच आपल्या 'करिअर' च्या संवर्धनासाठी आणि संरक्षणासाठी आपली तार्किक बुद्धी व सद्सद्विवेक बुद्धी सत्ताधाऱ्यांच्या आणि धनदांडग्यांच्या चरणी गहाण टाकणाऱ्या काही शास्त्रज्ञांसारख्या बुध्दिमंत बाळांवर आंधळा विश्वास टाकण्याचे दिवस या आपल्या जगण्याच्या संपूर्ण बाजारीकरणाच्या प्रक्रियेत केव्हाच मागे पडलेले आहेत!**

कुलकर्णी म्हणतात त्याप्रमाणे १ ग्रॅम युरेनियममध्ये जशी ३००० किलो कोळशाइतकी ऊर्जा सामावलेली असते, तशीच अशातऱ्हेच्या विनाशकारक केंद्रिभूत शास्त्रीय प्रयोगांनी व केंद्रिभूत अर्थकारणाने आपापल्या 'टोळ्या' बनवून बसलेल्या मोजक्या राजकीय व उद्योजक घराण्यांच्या हाती प्रचंड सत्ता व पैसा केंद्रिभूत होतो. मग अशांच्या पालखीचे भोई होऊन ज्ञान पसरविण्याच्या बहाण्याखाली अज्ञान पसरविणारे अणुशास्त्रज्ञ तर 'स्यूडो सायंटिस्ट्स' या नामाभिधानापेक्षाही भयानक म्हटले पाहिजेत! इतर शास्त्रज्ञांसारखाच अणुशास्त्रज्ञ हा एक साधा शास्त्रज्ञ असतो. पण पूर्वी हाताच्या बोटांवर मोजण्याएवढ्या देशांकडे असलेल्या अणुतंत्रज्ञानामुळे पूर्वापार एक प्रगाढ गूढतेचं वलय अणुशास्त्रज्ञांभोवती जमा झालयं आज बऱ्याच देशांना हे अणुतंत्रज्ञान अवगत झाल्यावरही तो पांगुळगाडा (गूढतेच्या वलयाचा) सोडायला आपले अणुशास्त्रज्ञ तयार नाहीत, यातच ग्यानबाची मेख आहे! याच 'स्यूडो पॅट्रियाटिक' अणूशास्त्रज्ञांनी काय धुडगूस घातलायं तो पहायला कुलकर्णींनी फार दूरवर जायला नको फक्त तारापूरला जाऊन एकदा चक्षुर्वे सत्यं पाहण्याची तसदी घ्यावी. **अणुभट्ट्यांमध्ये हलाखीच्या आर्थिक स्थितीतील कंत्राटी कामगारांचा अत्यंत असुरक्षित व धोकादायक वापर, संपुष्टात आलेली पिढयापिढयांची कोळी बांधवांची मासेमारी आणि अणुउत्सर्जनाशी संबंधित गंभीर आजारांचं थैमान.. मात्र त्याची कुठलीही दखलपात्र नोंद 'न' ठेवण्याची दक्षता घेणारी, तसेच कुठल्याही अणूप्रकल्पाभोवतीच्या ५-२५ किलोमीटर परिसरातल्या नागरिकांच्या आरोग्याचे सातत्यानं ठराविक काळानंतर खात्रीलायक व पारदर्शक कुठलंही सर्वेक्षण जाणीवपूर्वक 'न' करणारी संवेदनशून्य सरकारी यंत्रणा, एकदा या डॉक्टरांनी आमच्यासारख्यांच्या सोबत येऊन पहावीच, हे आमचं त्यांना उघड आव्हान आहे!**

ज्या हिटलरी प्रवृत्तींचा उल्लेख राजू परूळेकरांनी आपल्या लेखात केलाय तो वस्तुतः जैतापूर माडबन परिसरातील सरकारी दडपशाहीच्या संदर्भात व विशेषतः मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाणांच्या जैतापूर भेटीनंतरच्या रात्रीच्या अंधारात बेगुमानपणे आणि निर्दयपणे राबवल्या गेलेल्या 'हम करेसो कायदा' वृत्तीच्या अटकसत्राला व पोलिसी छळवणुकीच्या संदर्भातील आहे. 'कोकणात तुम्ही याल, पण तुम्हाला परत जाऊ देणार नाही' एखाद्या गैंगस्टरला साजेशी खुलेआम धमकी जेव्हा महाराष्ट्राचे उद्योगमंत्री आणि कोकणचे महसूल मंत्री देतात तेव्हा ते हिटलरच्या वंशावळीतले वाटतात की, महात्मा गांधींचे गणगोत शोभतात, याचे एकदा डॉक्टरांनी 'निदान' केले तर बरे! वर्षभर उनाडक्या करायच्या आणि परीक्षा आली की अभ्यासाची धावपळ करायची, अशी दारूण अवस्था या भारतातल्या राजकारण्यांची आणि शास्त्रज्ञांची आहे. **चीन-जपान फ्रान्सप्रमाणे लोकसंख्येच्या नियमनाचे पन्नास ते साठ वर्षांपासूनच कठोर शिस्तीचे धडे घालून देणे यांना तेव्हा जमले नाही किंवा ती दूरदृष्टीही नव्हती. शिवाय त्यांनीच राबविलेल्या धोरणांमुळे आणि शोषणतंत्रांमुळे निर्माण झालेल्या या चंगळवादी जीवनशैलीच्या लपलपणाऱ्या जिव्हा आटोक्यात आणण्याची कुठलीही इच्छाशक्ती वा धैर्य या हतवीर्यांकडे नाही. पण फ्रान्स-चीन 'जपानसारख्या विनाशकारी अणुऊर्जा (त्यातही हे तीनही देश आपल्या फुकुशिमाच्या अणू संकटानंतर आपल्या अणू धोरणात तातडीने बदल करीत आहेत, हेही ध्यानात घ्या!) धोरणांचा 'जमालगोटा' मात्र हे आम्हाला इतर पर्याय नाही म्हणत** (TIN Effect) **जबरदस्तीने द्यायला निघाले आहेत. ५०-६० वर्षांचा अक्षय ऊर्जा (विशेषतः सौरऊर्जा, जी आपल्या देशात मुबलक आहे) संशोधन व निर्मितीचा बॅकलॉग, हे आज जागे होऊन ५-१० वर्षांत अणुऊर्जेच्या महासंहारक पर्यायाने भरायला निघालेत!**

कुलकर्णी, वैशाली पाटील, मा. न्या. कोळसेपाटील, प्रदीप इंदुलकर, डॉ. विवेक मॉंटरो यांना तुम्ही आणि तुमचे बोलविते धनी नारायण राणे 'बाहेरचे लोक' म्हणता, मग फ्रान्सचे अरेवा कंपनीवाले व अमेरिकेचे जी.ई. कंपनीवाले, फ्रान्सचे अध्यक्ष सारकोझी, अमेरिकेचे अध्यक्ष बराक ओबामा हे काय कोकणचे 'झिल' का 'जावबापू' लागून गेलेतं? तसेच स्वतः अनिल काकोडकर, सी. बी. जैन, एस. के. जैन, शशिकांत धारणे, रवींद्र काळे यांच्याकडे काय कोकणचे सातबारे आहेत? अहो वैद्य, हा महाकाय विनाशकारी प्रकल्प आणि तदुषंगानी येणाऱ्या इतर नोकरीधंद्याच्या बाबी यामुळे कोकणाच्या संस्कृतीवर, उत्तरेतून येणाऱ्या लोंढ्यांमुळे जो 'घाला' पडणार आहे आणि अवघ्या कोकणाच्या संस्कृतीचा एकूणच जो 'गोपाळकाला' होणार आहे. त्या लोंढयांना वैद्यबुवा तुम्ही आणि तुमच्यासारखे अनेक कोकणच्या संस्कृतिचे मारेकरी, काय 'घरजावई' करून घेणार आहात काय? जैतापूरच्या संभाव्य किरणोत्सर्गाविषयक परूळेकरांच्या लेखातल्या माहितीला अशास्त्रीय म्हणता, मग जपानच्या फुकुशिमाचा किरणोत्सर्ग रोखताना तुमची सगळी शास्त्रीय तत्त्व कुठे गेली आहेत ? तुमचे ते डॉ. अनिल काकोडकर, त्यांच्या अमोघ ज्ञानाचा फायदा जपानच्या किरणोत्सर्गबाधित जनतेला करून द्यायला, तातडीनं जपानला का धावले नाहीत? निदान काकोडकरांना भविष्यात भारतात अशी परिस्थिती उद्भवली तर काय करायला हवं, याचे दोन-चार प्राथमिक धडे तरी गिरवता आले असते. आपल्या भारतात विशेषतः महाराष्ट्रात, 'डिझास्टर मॅनेजमेंट' नसून 'मॅनेजमेंटचं डिझास्टर' आहे, हे २६ जुलै-२००५ आणि २६ नोव्हेंबर-२००८ ला तमाम जनतेनं फार वाईट रीतीने अनुभवलयं! त्यामुळे वैद्यबुवा, आपल्याकडे 'जैतापूर' सारख्या महाकाय अणुभट्टीतर सोडाच, पण 'तारापूर' सारख्या लहानसहान अणुभट्टीत जरी कुठल्याही स्वरूपाचा आण्विक अपघात घडला तर काय भयानक तारांबळ उडेल, याची कल्पनाही करवत नाही (पण त्यासाठी प्रत्यक्ष तारापूरला जाऊन जागेची सखोल पहाणी करायला हवी!) अणुऊर्जेसारखे अन्य कुठलेही पर्याय हे पृथ्वीवरच्या सजीवांच्या अस्तित्वाच्या मुळावरच कुठल्याही बेसावधक्षणी उठू शकतात, याचं कारणच मुळी अत्यंत कमी मात्रेत त्यात निसर्गतः साठलेली अफाट ऊर्जा हे आहे!

**डॉ. मिलिंद कुलकर्णींना आख्या कोकणवासीयांची, विशेषतः जैतापूर माडबनवासीयांची कुणी 'पॉवर ऑफ ॲटनी' लिहून दिली आहे की, आख्या कोकणाचा 'सातबारा' त्यांच्या नावावर लिहून दिलाये? कोकणाचं निसर्गसंपन्नतेच्या सान्निध्यातलं सुखसमाधान वेगळं आणि गरिबी वेगळी! कुलकर्णीबुवा म्हणतात, त्याप्रमाणे जर कोकणात अठरा विश्व दारिद्र्य आणि बेरोजगारी नांदत असेल (स्वातंत्र्यप्राप्तीच्या ६४ वर्षांनंतर) आणि जैतापूर-माडबनच्या आसपासच्या भागात ५३ टक्के रेशनकार्डे दारिद्र्यरेषेखाली असतील, तर तो प्रश्न त्यांनी राजू परूळेकरांना नव्हे, तर कोकणच्या पालक मंत्र्यांना विचारायला हवा.** कोकणातली गरिबी नष्ट करण्याच्या बहाण्याखाली, त्यांचं नैसर्गिक सुखसमाधान आणि कोकणी-संस्कृती कायमची नेस्तनाबूत करायची आणि येणाऱ्या उत्तरेतल्या लोंढयांवर वचक ठेवून आपल्या 'व्होट बँका' आणि पिढ्यान्पिढयांच्या समृद्धीची कोठार निर्माण करायची, हे धंदे चालणार नाहीत! राहिला मुद्दा सौरशक्तीचा... Gridless Power is always Grindless Power! **ज्यात कोणी फारसं भरडलं जात नाही किंवा पर्यावरणाचं नुकसान होत नाही. तुम्हाला लाख, दरडोई दरवर्षाला ५००० किलोवॅट तास काय किंवा १०००० किलोवॅट-तास काय विद्युतऊर्जा हवी असेल, पण ती पृथ्वीच्या एकूण पर्यावरणाला कायमस्वरूपी झेपायला तर हवी ना? की, पुढच्या भावी पिढ्यांच्या वाट्याचं सगळं ओरबाडून याच दोन-चार पिढ्यांनी उन्मत्तपणे भोगून संपवून टाकायचं?** आपली जीवनशैली आणि त्यासाठी ऊर्जेचा वापर हा केवळ आपण 'जेवढं निसर्गाकडून घेऊ, तेवढं निसर्गाला परत देऊ' याच तत्त्वावर व्हायला हवा.. तिथे पृथ्वीराज चव्हाण, अजितदादा पवार किंवा अनिल काकोडकर काय किंवा अन्य कोणी काय, या कोणालाही अखिल मानवजातीच्या अंतिम व अनंतकाळच्या हितासाठी दुसरा कुठलाही 'चॉईस' असण्याची सुतराम शक्यता नाही! सध्या जे चाललयं (त्यात पृथ्वीच्या पोटात ढकलला जाणारा हजारो-लाखो वर्षे टिकणारा अणुभट्ट्यांमधला घातक किरणोत्सारी हजारो टन कचरासुध्दा आला, याची जबाबदारी पुढील पिढयांवर ढकलून आपण मोकळे होऊ पाहतोय!) तो विकासाचा प्रवास नसून विनाशाच्या दिशेने प्रवास आहे. एखादा अर्धवट ज्ञानी डॉक्टर (MBBS किंवा तत्सम अर्हता प्राप्त नसलेला... डॉ. कुलकर्णींची अर्हता अजून तपासायचीच आहे!) अँटिबायॉटिक्स्चा बेलगाम वापर करून रोग्यांच्या जीवाशी किंवा रोगप्रतिकारक क्षमतेशी जसा खेळत असतो किंवा चांगल्या स्ट्रक्चल इंजिनीअरच्या सल्ल्याविना बांधलेली इमारत कितीही सुंदर असली तरी जशी टिकाऊ नसते, तशीच तथाकथित विकासाची तकलादू धोरणं, **'हत्ती आणि चार आंधळे या कथेतल्याप्रमाणे आपल्या अपुऱ्या समजुतीच्या किंवा आकलनाच्या आधारावर आखण्याचं धोकादायक काम, आपल्या देशात मोठया प्रमाणावर चालू आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, 'प्रत्येक पिढी हे एक स्वतंत्र राष्ट्र असते आणि ज्याप्रमाणे एका राष्ट्राला दुसऱ्या राष्ट्रावर आक्रमण करण्याचा अधिकार नसतो, त्याचप्रमाणे एका पिढीला दुसऱ्या पिढीवर आक्रमण करण्याचा अधिकार नसतो', असं जे म्हणाले होते ते या संदर्भात समजून घेणं फार गरजेचं आहे!**

सौरऊर्जेसारख्या अक्षय व पर्यावरणावर किमान आघात करणाऱ्या पर्यायांचाच स्वीकार यापुढे जगाला करावयास लागेल आणि फुकुशिमाच्या आण्विक अपघाताच्या पाश्वभूमीवर अणुऊर्जेविरोधात जी जागतिक पातळीवर संतापाची तीव्र लाट उसळली आहे (जपानमधले नागरिक फार मोठ्या प्रमाणावर

अणुभट्ट्याबाबत सत्य लपवून ठेवल्याबद्दल तिथल्या सरकार व अणुशास्त्रज्ञांवर फार संतप्त आहेत, हे संबंधितांनी ध्यानात घेणं गरजेचं आहे) त्यामुळे तर बहुतेक देशांच्या सरकारांची (यात चीन प्रामुख्यानं आला) झपाट्यानं सौरऊर्जा विकसित करण्याची धडपड चालू झाली आहे. त्यामुळे सौरऊर्जेला अणुऊर्जेच्या किती पट जागा लागते, हा मुद्दाच पूर्णतः गैरलागू असून अशा अक्षयस्त्रोतांव्दारे (त्यात सौरऊर्जेखेराज पवनऊर्जा, बायोमास, लहानसहान धरणे व बंधारे, सागरी लाटा इ.) आपण जास्तीत जास्त किती ऊर्जा मिळवू शकतो, तदनुसारच आपल्या देशाच्याच नव्हे तर जागतिक लोकसंख्येबाबतची आणि पर्यावरणाला झेपेल इतपतच उच्च जीवनशैली राखण्याबाबतची धोरणं, तातडीनं आखावी लागतील, अणुऊर्जेसारख अन्य कुठलेही पर्याय हे पृथ्वीवरच्या सजीवांच्या अस्तित्वाच्या मुळावरच कुठल्याही बेसावधक्षणी उठू शकतात, याचं कारणच मुळी अत्यंत कमी मात्रेत त्यात निसर्गतः साठलेली अफाट ऊर्जा हे आहे! आपले अणुशास्त्रज्ञ हे कोणी 'ब्रह्मा-विष्णू-महेश' नव्हेत, तेव्हा हा निसर्गतः बाटलीत कोंडला गेलेला आण्विकशक्तीचा ब्रम्हराक्षस बाटलीतच राहू द्या, अन्यथा बाटलीबाहेर त्याला काढल्यास 'पॅडोराज-बॉक्स' उघडल्यासारखं होईल. महाभारतात अश्वत्थाम्यानं सोडलेलं ब्रह्मास्त्र रोखायला श्रीकृष्ण होता, पण आधुनिक भारतात अणुशास्त्रज्ञरूपी अश्वत्थाम्यांनी पेरलेली अणुऊर्जेची ब्रम्हास्त्रे रोखायला कृष्ण कुठेचं नाही. राजकारणी 'कंस' मात्र उदंड आहेत! **कुलकर्णी, तुमच्यासारखे अणुऊर्जेच्या 'लाभाच्या' लखलखाटाने आंधळे झालेले लोक, आम्हाला अशास्त्रीय ठरवून 'लांडगा आला रे आला' या कथेतल्या तरूणाप्रमाणे 'व्यर्थ हाकाटी करणारे', अशी आमची संभावना करतात. पण वैद्यबुवा शेवटी एक गोष्ट लक्षात ठेवा की, त्या 'लांडगा आला रे आला' या कथेतसुध्दा शेवटी लांडगा आला होताच! फरक एवढाच आहे की... चेनेरबिल फुकुशिमासारख्या आण्विक अपघाताच्या 'लांडग्याच्या जबड्यात, त्या कथेतल्याप्रमाणे एखादा हाकाटी करणारा तरूणच जाईल असं नव्हे, तर जैतापूर माडबनसह उभा कोकण, उर्वरित महाराष्ट्रातल्या मुंबई, ठाणे, पुणे भागासकट जाईल, हे ध्यानात असू द्या!**

डॉ. मिलिंद कुलकर्णी, शेवटी झोपी गेलेल्याला जागं करणं सोपं असतं, पण झोपेचं सोंग घेतलेल्याला जागे करणं महाकर्मकठीण असतं. म्हणून अशा विज्ञानाच्या दशावतारी सोंगांना 'भारतरत्न' द्यायचं की, 'चौदावं रत्न' दाखवायचं याचा समस्त कोकणी जनता योग्य वेळी निर्णय घेतल्याखेरीज राहणार नाही!!!

***...राजन राजे***
**(अध्यक्ष: धर्मराज्य पक्ष)**

# कंत्राटी-कामगारपद्धतीतील 'गुलामगिरी व नव-अस्पृश्यता', हा देशातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा!

## इंडिया आघाडीच्या संकल्प जनसभेत, राजन राजे यांची जाहीर केली 'धर्मराज्य पक्षा'ची स्पष्ट, परखड भूमिका....




**भाजपच्या केंद्र सरकारच्या विरोधात स्थापन करण्यात आलेल्या, देशातील विरोधी पक्षांच्या इंडिया (INDIA) आघाडीच्या समर्थन-संकल्प जनसभेत बोलताना धर्मराज्य पक्षाध्यक्ष राजन राजे रोखठोक गरजले की, हिंदुराष्ट्राची स्थापना करण्यासाठी सुरु असलेला घृणास्पद प्रयत्न आणि त्या हल्ल्यातून संविधान वाचवणं, या मुद्द्यावर अनेकजण बोलत असताना, त्यापलीकडे जाऊन मी असं सांगेन की, या देशातील कंत्राटी-कामगारपद्धतीतील नव-अस्पृश्यता, हा सर्वात महत्त्वाचा मुद्दा असून, आजच्या आधुनिक भारतातील शेतकऱ्यांची मुलेसुद्धा आता, कंत्राटी-कामगार पद्धतीतील शापित जीवन जगताहेत. कामगार चळवळीत २० ते २५ वर्षे घालवल्यानंतर, प्रत्यक्ष राजकारणात भाग घेत, कंत्राटी-कामगार पद्धतीमधील गुलामगिरी व नव-अस्पृश्यतेविरुद्ध 'धर्मराज्य पक्षा'च्या झेंड्याखाली या महत्त्वपूर्ण 'अजेंड्या'वर धर्मयुद्ध पुकारलं. त्यातच भरीसभर असा अन्याय-अत्याचार-शोषणाचा कहर म्हणजे, भारतातील कामगार-कर्मचारीवर्गावर नव्या 'कामगार-संहिते'द्वारे, काळे कायदे लादले जातायत, जे निव्वळ धनदांडग्या भांडवलदारी-व्यवस्थेच्या चांगभल्यासाठी आणि कामगार-कर्मचारीवर्गासह समस्त कामगार-चळवळीला बरबाद करण्यासाठी, गुलामगिरीत ढकलण्यासाठी आहेत. भाजपा-संघाने आधी मुस्लिम-दलितांना 'लक्ष्य' (टार्गेट) केलं, नंतर शेतकऱ्यांना आणि आता कामगारांना 'लक्ष्य' बनवलं जातंय.**

या सगळ्या घटनाक्रमा मागे, देशातील 'भांडवली-व्यवस्थे'चा महापातकी हात असून, या व्यवस्थेविरोधात आपण उभे राहणार आहोत की नाही? ...असा सरतेशेवटी थेट सवाल करीत राजन राजे आपल्या भाषणात पुढे म्हणाले की, आगामी २०२४च्या निवडणुकीत भारतातील सर्व विरोधीपक्षांनी आता आपली एकजूट दाखविण्याची ही, शेवटची संधी असून जगाच्या तुलनेत भारतातील कामगारांची संख्या सर्वात जास्त असल्याकारणाने, खऱ्याअर्थाने देशातील कष्टकऱ्यांची ताकद या, मोदी-शहांच्या रासवट भाजपाई राजवटीविरोधात उभी करणे, ही काळाची गरज आहे आणि म्हणूनच, आमच्या 'धर्मराज्य पक्षा'तर्फे आम्ही इथे निक्षून सांगत आहोत की, किमान ३००-३२५ जागांवर तरी INDIA आघाडीने एकाला एक उमेदवार द्यावा... उरलेल्या काही जागांवर बहुरंगी निवडणुका लढती खुशाल होऊन जाऊ द्यात... त्यातून INDIA आघाडीतल्या नेमक्या कुठल्या पक्षाची लोकप्रियता जास्त आहे, ते प्रत्येक पक्षाला नीट आकळून येईल आणि ते INDIA आघाडीच्या पुढील वाटचालीसाठी पथदर्शक ठरेल... तेव्हा, सध्याच्या मोदी-शहाप्रणित 'अघोषित आणीबाणी'चा मुकाबला करण्यासाठी 'धर्मराज्य पक्षा'सह सर्वांनीच कोणत्याही अटी-शर्तींविना INDIA आघाडीला पाठिंबा द्यावा!

मुंबईच्या सांताक्रूझ येथील पटूक महाविद्यालयाच्या सभागृहात मंगळवार, दि. ३० ऑगस्ट-२०२३ रोजी, पार पडलेल्या या जनसभेसाठी राष्ट्रीय पातळीवरील अनेक नेते सामील झाले होते. त्यात, लवकरच वयाची शंभरी गाठू शकणारे ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी डॉ. जी.जी. पारीख, सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर, तिस्ता सेटलवाड, शेतकरी नेते राकेश टिकैत, सीपीएम नेते डॉ. अशोक ढवळे, सीपीआय नेते डी. राजा, सीपीआय/एमएल महासचिव दीपंकर भट्टाचार्य, समाजवादी पक्षाचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष अबू आझमी, जनता दल खासदार अनिल हेगडे, राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रवक्त्या विद्या चव्हाण, सामाजिक कार्यकर्ते डॉ. सुनीलम, रिपाई नेते श्याम गायकवाड, सामाजिक कार्यकर्त्या उल्का महाजन, पत्रकार आणि समाजसेवक डॉ. सलीम खान, सामाजिक कार्यकर्ते डॉल्फी डिसोझा, आम आदमी पार्टीचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष धनंजय शिंदे, सामाजिक कार्यकर्ते फिरोझ मिठीबोरवाला (संयोजक), सामाजिक कार्यकर्त्या प्रतिभा शिंदे आदी मान्यवरांनी उपस्थित राहून, आपापली मते मांडली. याप्रसंगी धर्मराज्य पक्षाचे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष महेशसिंह ठाकूर व रमाकांत नेवरेकर हे ही उपस्थित होते. **यावेळी जम्मू-काश्मीरचे माजी राज्यपाल 'सत्यपाल मालिक' यांनी, दृकश्राव्य माध्यमातून आपले विचार मांडून, पुलवामा-हल्ल्याच्या निमित्ताने भाजपने केलेल्या निवडणुकीच्या राजकारणाचा भांडाफोड केला. संकल्प-सभेची सुरुवात महात्मा गांधींचे पणतू तुषार गांधी यांनी पाठविलेल्या पात्राच्या वाचनाने झाली. सभेतील सर्व वक्त्यांनी इंडिया आघाडीच्या समर्थनार्थ आपापली भूमिका मांडली. देश आणि देशाची राज्यघटना (संविधान) सुरक्षित ठेवायची असेल तर, सर्व लोकशाहीवादी व धर्मनिरपेक्षवादी विचारसरणीच्या लोकांना, एकत्र येऊन लढावं लागेल, यावर सर्व वक्त्यांचे आणि उपस्थित पदाधिकारी-कार्यकर्त्यांचे मतैक्य झाले.**

## कोकणात, विनाशकारी प्रकल्प नकोच!..

*(पान क्र. १ वरुन)*

रामाची म्हणा अथवा परशुरामाची म्हणा, कोकणभूमि ही कुठून कशी निर्माण झाली, या इतिहासाचं तसं काही फारसं महत्त्व नाही. भारताने कधिही इतिहासाची फारशी पर्वा केलेली नाही. तो असतो, फक्त घडून गेलेल्या घटनाक्रमाचा धूळ खात धूसर होत गेलेला, एक काळाचा विस्तीर्ण पट. पाश्चात्यांमध्ये 'मुमुक्षू धारणा' नसल्यानेच त्यांना वाळूत चोच खुपसून बसलेल्या शहामृगासारखं इतिहासाचं जतन करण्याचं फार वेड, अगदी विकृतीकडे वळण्याइतपत!

पण, ''निसर्गसुंदर कोकणाच्या रुपाने जी काही 'अनुभूती' पिढ्यानपिढ्या साक्षात आपल्यापुढे उभी आहे, तोच परब्रह्माचा अद्वितीय साक्षात्कार आहे. जैवबहुविविधतेनं व्यापलेली आणि खाडी-समुद्रकिनारे, नदीनाले, विहीरी-तलाव यांनी नटलेली... कमालीची निसर्गसुंदर कोकणभूमि ही, स्वतःचं एक परमात्म्याचा लौकिक-पारलौकिक असा दुहेरी व दुर्मिळ संकेत आहे आणि तेच, कोकणी चिरंतन-सत्य आहे''! आपल्या हृदयाच्या कडेकपारीतून त्या निसर्गसौंदर्याचं आपल्याला नुसतंच केवळ प्रेम नाही; तर, अगदी वेड लागलं पाहीजे... तोच, आपल्यासाठी 'अमृता'चा शोध, तेच 'चिरंतन तत्त्व' होय!

या कोकणाच्या अनुपम सृष्टीसौंदर्याचं डोळ्यात तेल घालून संरक्षण-संवर्धन करणं, हीच खरीखुरी 'धार्मिकता' आणि तेच खरं भारतीय-अध्यात्म आहे, हे ज्यादिवशी आपल्याला उमगेल, तो खरा सुदिन होय. या विशालदृष्टीने परमात्म्याला एकदा जाणून घेतलं की, जैतापूर अणुप्रकल्प किंवा कालचा नाणार अथवा आजचा बारसू-सोलगाव रिफायनरी प्रकल्प तर सोडाच... पण, शाडूची माती व नैसर्गिक रंगांऐवजी, निसर्ग-पर्यावरणाला घातक अशा प्लॅस्टर ऑफ परिसमधून व हानिकारक रासायनिक रंगांच्या प्रयोगातून घडवलेल्या गणपतीबाप्पाच्या मूर्तिसुद्धा, आपल्या मनात प्रश्नचिन्ह निर्माण करत्या होतात, ही या जाज्वल्य भारतीय-अध्यात्माची अंगभूत ताकद आहे!

**कोणी केवळ कोकणात जन्माला आला म्हणून, 'कोकणी' नाही होऊ शकत. त्याचं कोकणावर हाडाचं प्रेम असायला हवं, आपल्या अंतरात्म्याच्या सांदीकोपर्यातून कोकणावर नितांत प्रेम असायला हवं... तरच तो खरा कोकणी! कोकण नावाच्या आहत-अनाहत ईश्वरी-संकेताशी तुम्ही तद्रूप व्हायला हवं; तरच, तुम्ही कोकणी. नुसती भजनं, किर्तनं, दशावतारी नाटकं, बाल्यानृत्यं केल्यानं अथवा अनंतचतुर्दशीपर्यंत टाळगजरात गणेशोत्सव साजरे केल्यानं कोणी 'कोकणी' नाही होऊ शकत... या निसर्गसौंदर्याच्या अतुलनीय वर्षावात राहूनही जो नुसताच 'ओला' होतो; पण, आतून 'भिजत' नाही, तो कोकणी नव्हेच!**

'कणाकणानं कोकण' ज्याच्या नसानसात भिनतं, रक्तात भिरभिरु लागतं आणि अंतरात्म्यापर्यंत खोलवर पाझरत थेट अस्तित्वालाच भिडतं... तो खरा कोकणी!

अन्यथा, 'कोकणातला जन्म' हा एक नुसताच 'गोड अपघात' (खरंतर,सत्यकठोर शब्दात सांगायचं तर, एक 'दुर्घटना'च होय... जी, 'राणे-कुटुंबियां'च्या बाबतीत घडलीय) मानला जायला हवा.

'कोकणाचं सृष्टीसौंदर्य आणि कोकणी माणूस', हे 'अद्वैत' आहे. ते एकमेकापासून वेगळं काढलं जाऊच शकत नाही. कोकणी-हिरवाईला कॉंक्रिटच्या राखाडी रंगाने आणि खनिज तेल, कार्बनी धुराच्या काळ्या रंगाने रंगवू पहाण्याचा अट्टाहास कराल; तर, कोकणाची भविष्यात राख कराल! एकदा का या 'रक्तपिपासू-शोषक व्यवस्थे'रुपी व्याघ्राच्या जीभेला विविध प्रकल्पांतल्या 'सत्ता आणि मत्ता' यांचं रक्त लागलं की, रोज नव्याने एकामागोमाग एक विकासाच्या नावाखाली 'विनाशकारी-प्रकल्प' कोकणात येतच रहातील... लाखो-करोडोच्या संख्येने 'परप्रांतीय मुंगळे' सगळीकडे कोकणभर घुसतील. जैन-गुज्जू-मारवाडी 'भांडवली-बाजारबसवे' कोकणाचा मूळ 'बाजार' उठवतील... त्यांच्याकरवी, कोकणाचं 'जैववैविध्य' क्रूरपणे नष्ट केलं जाईल आणि 'एकसुरी रोखीची पिकं' सर्वत्र काढली जातील. 'पैसा आणि उन्मत्तपणा' यांचा करोनापेक्षाही भयंकर संसर्गजन्य 'आजार' कोकणभरात सर्वत्र बेफाम फैलावेल. त्या हडेलहप्पीत कोकणाचा निवांतपणा कधि संपेल, कळणारसुद्धा नाही आणि, मग रोगट कोकण आणि राजस्थानचं रणरणत वाळवंट... रोगट कोकण आणि कोलाहलाने मातलेली निष्प्राण-निर्जीव मुंबापुरी, यातला फरक हळूहळू; पण, निश्चितपणे एका संथगतीने कमीकमी होत जाईल.

**तसंही, ज्यांची 'गिधाडासारखी दुष्ट नजर' गेल्या काहीकाळापासून कोकणाच्या सृष्टीसौंदर्यावर पडत आलेली आहे, ती या निर्मम-शोषक व्यवस्थेतली राजकीय-प्रशासकीय धटिंगण मंडळी, जेव्हा आम्ही जैतापूर-अणुप्रकल्पाविरोधात आमचं सर्वस्व पणाला लावून लढत होतो; तेव्हा, ''कुणी कोकणात किंवा अन्य कुठे जन्म घेणं, हा निव्वळ एक अपघात असतो; त्यामुळे विशिष्ट भूभागात जन्म घेता झाल्यानं कुणी तिथला 'निरंकुश-स्वामी' (अलीश्रींश जुपशी) होऊच शकत नाही'', अशी संतापजनक मुक्ताफळं बेधडक उधळत होतीच आणि त्याचा सार्थ कडवा प्रतिवाद करत आम्ही आंदोलनाची तीव्रता वाढवत नेत होतो... कुठेही दडपशाहीपुढे हार न मानता, आंदोलनात नरमाई जराही न आणता!**

तेव्हा, काय किंवा आज काय... तेच 'राणे-कुटुंबिय', स्वतःसाठी व आपल्या बगलबच्च्यांसाठी, पैशाचं अमाप पीक निर्माण करण्यासाठी (त्यांची 'देहबुद्धी' यापलिकडे जाणंही शक्य नाही... जैतापूर अणुप्रकल्प किंवा बारसू-सोलगाव तेलशुद्धीकरण-प्रकल्प, हे भयानकरित्या निसर्ग-पर्यावरणघातकी असण्यामागची खोलवर जाण त्यांच्या अल्पस्वल्प बुद्धीला कुठून येणार?) आपल्या 'बाहुबला'सह व पाशवी पोलिसबळासह आंदोलकांच्या जीवावर उठलं होतं आणि आजही परिस्थिती फारशी वेगळी नाही. फरक एवढाच की, तेव्हा ते शिवसेनेतून कॉंग्रेसमध्ये नुकतेच प्रवेश करते झाले होते आणि आता कॉंग्रेस, 'स्वाभिमानी' (फक्त, नावापुरतेच स्वाभिमानी... बाकी, त्या त्या वेळेस जे राजकीय-बॉसेस असतील, त्यांच्या एका इशाऱ्याने 'स्वाभिमान गहाण' ठेवत, अविचारी कृति करुन मोकळे होणारे) वगैरे वगैरे प्रवास करत आता, 'ईडीपासून कातडी' बचावण्यासाठी 'बीजेपी'त डेरेदाखल झालेत, एवढंच. 'पैशात आणि सत्तेत' सगळी दुनिया मोजणारी, ही अशी राजकारणी धेंडं आणि त्यांना टगेगिरी करत, आर्थिक स्वार्थापोटी पाठींबा देणारे तथाकथित स्थानिक कार्यकर्ते, हे खऱ्याअर्थाने 'कोकणी' नव्हेच... हे जातिवंत कोकणी माणसानं समजून घेतलं पाहीजे. हे अंति कोकणाचे 'मारेकरी' आहेत. कोकणात कॉंक्रिटची थडगी बांधून नांगर-बैलगाड्या उध्वस्त करत, दिमाखात मारे ट्रॅक्टर-मोटरगाड्या फिरवणारे, हे उन्मत्त राजकारणी, जर स्वतः ला कोकणाचे 'विकासपुरुष' म्हणून घोषित करत असतील... तर, त्याची फार मोठी किंमत कोकणाला चुकवावी लागणार आहे, लागतेच आहे.

तरीही जर, त्यांना आम्ही मतदान करत रहाणार असू; तर, मग 'मतदार' म्हणून आपणही आपला मूळ नैसर्गिक 'कोकणीपणा आणि कोकणी बाणा' भांडवली-बाजारात विक्रीला काढत आपसूकच कोकणावरचा आपला पिढ्यापिढ्यांचा हक्क गमावून बसतो!

कोकण काही वेगवेगळ्या जिल्ह्यांचा मिळून बनलेला नाही... ती फक्त, एक प्रशासनिक अथवा राजनैतिक व्यवस्था असू शकते. कोकण, हे एक 'नैसर्गिक एकक' आहे! म्हणूनच, अतुलनीय निसर्गसौंदर्य मिरवणाऱ्या कोकणात, कुठेही निसर्ग-पर्यावरणावर अपरिवर्तनीय आघात करणारे तथाकथित 'विकास-प्रकल्प' येताच, समस्त कोकणी जनतेनं पेटून उठायला हवं. पण, दुर्दैवानं तसं चित्र कोकणात कधि दिसत नाही... म्हणजे पुन्हा सर्वांच्याच, मूळ 'कोकणीपणा' विषयी संशय घ्यायला वाव आहेच.

बारसू-सोलगाव रिफायनरीतला धूर सह्याद्रीच्या कडेकपारीत अडकून परतणार, कोकणात दूरवर पसरत जाणार, अवघ्या कोकणाला नासवणार, हे निश्चित... इथे अंबानींच्या हाजिरा येथील तेलशुद्धीकरण-प्रकल्पासारखी भौगोलिक स्थिती नाही.

तसंही, जगाच्या पाठीवर कुठेही असलेले किंवा होणारे तेलशुद्धीकरणप्रकल्प, अणुप्रकल्प, औष्णिक ऊर्जाप्रकल्प किंवा रासायनिक प्रकल्प, हे अंति निसर्ग-पर्यावरण उध्वस्त करणारेच असतात... पण, ते उभारण्यासाठी तुमचं-माझं कोकण, ही सर्वात अयोग्य जागा होय... निसर्ग-पर्यावरणावरावर तो थेट प्रलयंकारी आघातच होय.

कोकणभूमि, ही कोकणी मायलेकरांची पोटाची खळगी भरायला कधिही असमर्थ नव्हती... कालही नव्हती, आजही नाही आणि उद्याही नसेल. पण, आण्विक-रासायनिकदृष्ट्या प्रदूषणकारी व कार्बन-ऊत्सर्जन करणारे विकासप्रकल्प आले की, मग मात्र, भांडवलशाहीतल्या 'पैशाचिक आणि पिशाच्चिक' आदान-प्रदानाखेरीज इतर कुठलाही 'जैविक पर्याय' कोकणी-माणसाला उपलब्ध नसेल. लक्षात घ्या की, कोणत्याही अशा पायाभूत प्रकल्पांमुळे समाजातील ज्या घटकांना (दलाल राजकारणी व प्रशासकीयवर्ग, बडा जमीनदारवर्ग इ.) दीर्घकालीन अथवा अल्पकालीन लाभ होतो, त्यांना प्रकल्पाच्या हानीची फारशी तत्काळ झळ कधि पोहोचत नसते (सरतेशेवटी, पर्यावरणीय महासंकटं सगळ्यांनाच ग्रासणार आहेत)... पण, ज्या समाजघटकांना ती हानी पोहोचते, ते मात्र आयुष्यातून कायमचे उठतात आणि 'व्यवस्थे'तले गुलाम बनतात!

...असो, या प्रदीर्घ लेखाचं-संदेशाचं प्रयोजन, ''अनंताकडून अनंताकडे असा, चिरंतन-अनंत यात्रेचा भारतीय-आध्यात्मिक प्रवास, पंथस्थ म्हणून आपण कुणी विसरुन गेलो असल्यास अथवा आपलं शिवबा-संतांचं जाज्वल्य हिंदुत्व व त्यातील 'आध्यात्मिक-गौरव' आपण विसरुन गेलो असल्यास, त्याचं स्मरण करुन देण्यासाठी व जे झोपलेले आहेत, त्यांना जागं करण्यासाठी आणि जे पथभ्रष्ट झालेले आहेत, त्यांना पूर्वपदावर आणण्यासाठीच, केवळ होय''!

...कारण, कोकणाच्या विधिलिखिताशी भारतीय विधिलिखित अथवा भारतीय भाग्य जोडलं गेलेलं आहे आणि भारतीय भाग्याशी संपूर्ण जगाचं भाग्य जोडलेलं आहे! आपण कोकणी माणसंच जर हिंदू, जैन, बुद्ध, शीख धर्माने, थोडक्यात, 'भारतीय-अध्यात्मा'ने (ज्यात अनेक मुस्लिम-ख्रिस्ती चिंतक व विचारवंतांनीही मोठी भर टाकलेली आहेच) आजवर हजारो वर्षे तेवत ठेवलेले निसर्गसुंदर 'चैतन्याचे दीप'... निव्वळ रुपये, सोनं-चांदी-हिरेमाणिकांच्या हव्यासाने विझवायला उतावीळ झालो असलो; तर, होणारा अंधःकार फक्त कोकणापुरता सिमित नसेल; तो पुरत्या विश्वात फैलावेल... म्हणूनच, हे नीट ध्यानात घेतलं पाहीजे की, जो जो कुणी (मग, तो कुठल्याही जातधर्माचा असो) 'विनाशकारीपथा'वर नेणाऱ्या अशा प्रकल्पांना विरोध करतो, तो आपसूकच जातिवंत 'हिंदुत्वा'चा अधिकारी असतो आणि जो प्रकल्प जबरदस्तीने लादतो तो जन्माने हिंदू असूनही असतो, तद्दन 'ढोंगी हिंदुत्ववादी'... तो भारतीय-अध्यात्माने प्ररित झालेला नव्हे; तर, पाश्चात्य भांडवली-विचारणीने बाधित व रोगग्रस्त झालेला असा 'समाजघातकी' असतो... तेव्हा, सावधान!

***...राजन राजे*** (अध्यक्ष: धर्मराज्य पक्ष... भारतातील पहिलावहिला निसर्ग-पर्यावरणस्नेही 'हरित-पक्ष' ...The First Green-Political Party of India)

# कोकणातल्या 'विनाशकारी' प्रस्तावित 'अणुप्रकल्पां'च्या निमित्ताने.....

*''जिंदगी के दाम गिर गये, कुछ गम नहीं !*
*मौत की गिरती हुई कीमत से, घबराता हूँ मैं !!!....*
*-(नीरज जैन)*

*(जैतापूर की, 'जळितापूर' ?... जैतापूर की, 'मयतापूर' ??...)*
***कोकणातल्या 'विनाशकारी' प्रस्तावित 'जैतापूर अणूप्रकल्पा'च्या निमित्ताने.....***
***''महाराष्ट्रातला मायमराठी पिढ्यापिढ्यांना, हा कुणाचा कुठला शाप आहे,***
***गोतास 'काळ' ठरणारा 'दांडा' प्रत्येक गाव-शहरात उगवू पाहे !!!''.***

संतांची व ज्ञानी - तपस्वी मूर्तींची 'खाण' असलेल्या या महाराष्ट्राची एकेकाळची राकट-कणखर भूमि, गेल्या ४०-५० वर्षात आपल्या स्वार्थाचं 'खाणकाम' करून दिल्लीपासून गल्लीपर्यंत पसरलेल्या राजकारणी उंदीर-घुशींनी एवढी कमालीची पोखरून भुसभुशीत केलीयं की... पॅरीस, लंडन, वॉशिंग्टन येथून कुणीही यावं आणि कोपरानं खणून जावं! गोपाळकृष्ण गोखले, लोकमान्य टिळक, स्वा. सावरकर सेनापती बापट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सानेगुरुजी, प्रबोधनकार ठाकरे, एस. एम. जोशी, कॉ. श्रीपाद डांगे..... यासारख्या खऱ्या अर्थानं मराठ्यांच्या कल्याणाची पालखी वाहणाऱ्या दिग्गज राजकीय पुढाऱ्यांची परंपरा, जी एकदा खंडीत झाली, ती झालीच !!

छत्रपती शिवरायांची भाषणं कोणी ऐकली असण्याचा प्रश्नच उद्भवत नाही..... लो. टिळक, स्वा. सावरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इ. ची ध्वनिमुद्रित भाषणे कोणी क्वचितच ऐकली असतील, तरी हे राजकीय पुढारी महाराष्ट्राच्या पिढ्यापिढ्यांचे 'महानायक' बनतात, याला एकमेव कारण त्यांची महाराष्ट्र आणि राष्ट्रहिताची निर्भेळ- निःस्वार्थ भूमिका व त्याला अनुसरूनच असलेलं त्यांच दूरदृष्टीचं पारदर्शक राजकारण! महाराष्ट्रातल्या राजकारणाची ही उज्ज्वल परंपरा खंडित झाल्यामुळे मोकाट सुटलेल्या धनदांडग्या परप्रांतीय परभाषिकांनी, महाराष्ट्रातल्या सर्वपक्षीय भ्रष्ट राजकीय नेत्यांना हाताशी धरून (खरतरं खिशात घालून), अवघ्या मराठ्यांची आर्थिक व सांस्कृतिक कोंडी करून टाकलीयं. या चक्रव्यूहातील 'मराठी अभिमन्यू'... भय व आळस बाजूला सारून आणि सर्वपक्षीय भ्रष्ट राजकीय नेतृत्वाचे, तो आधारासाठी शोधत असलेले तकलादू 'खांदे' नाकारून... स्वतःच ठामपणे झाल्या 'कोंडी' विरुध्दचा 'झेंडा', हाती घेणार का, हा यक्षप्रश्न आहे!!!... कारण महाराष्ट्रातल्या विशेषतः कोकणपट्ट्यातल्या मराठी माणसाला यापुढे आपलं 'अस्तित्व' टिकविण्यासाठी जीवाच्या आकांतानं संघर्ष करावा लागणार आहे.

**''ज्या भूमिला कान लावले, तरी आजही शिवछत्रपतींच्या मावळ्यांच्या घोड्यांच्या 'टापा' आणि शिवरायांनी घोड्यावर मारलेली 'टाच' ऐकू येईल, त्या मराठ्यांचा इतिहास जागवणाऱ्या भूमिवर... पिढ्यान्पिढ्या वास्तव करणाऱ्या कोकणी मराठ्यांच्या अस्तित्वावरचं तथाकथित विकास प्रकल्पांच्या बुरख्याआड तुम्ही 'टाच' आणू पाहताय? परशुरामाच्या पदस्पर्शानं पावन झालेली 'भूमि' बरबाद करू पाहणारे, कोण तुम्ही?''...हा प्रत्येक कोकणी मनातला धगधगता ज्वालामुखी आहे.**

शांतपणं सुखासमाधानानं झोपलेल्या कोकणी माणसाला एके दिवशी तुम्ही अचानक झोपेतून धाडकन् उठवणार आणि म्हणणारं, ''चल उठ कोकणी माणसा, आम्हाला कळलं तू दुःखी आहेस, म्हणून तुला सुखी करण्यासाठी आम्ही खाणकाम, औष्णिकऊर्जा काय नी अणूऊर्जा काय, असे अनेक विकास प्रकल्प घेऊन आलेलो आहोत, तू फक्त आता विस्थापनासाठी आणि पुनर्वसनासाठी तयार हो म्हणजे झालं, नाहीतर??''. ही अशी अरेरावीची भाषा आणि घोर फसवणूक आहे... **कोकणी अस्मितेला पायदळी तुडविणारी राजकीय दादागिरी आहे.**

**अवघा कोकण प्रदेश खणून नेणारे तब्बल ५६ खाणकाम प्रकल्प, ४३ खाजगी बंदरे, १९ औष्णिकऊर्जा प्रकल्प आणि आता कायमस्वरूपी सजीवसृष्टीला किरणोत्सारी बाधा पोहचविणारा, किनाऱ्याच्या समुद्रतळाशी वाळवंट निर्माण करणारा आणि पिढ्यापिढ्यांच्या अस्तित्वावरचं प्रश्नचिन्ह निर्माण करणारा माडबन-जैतापूरचा (१६५० x ६=) ९९०० मेगावॅटचा विनाशकारी अणूऊर्जा प्रकल्प.... या साया तथाकथित विकासाच्या राक्षसी अट्टाहासानं नेमका कोणाचा 'विकास' साधला जाणार आहे? लाखो रुपयांचे धनादेश आणि ४-५ हजारांच्या दळभद्री 'कंत्राटी-नोकऱ्या', यांची आमिषं कोणाला दाखवतायं? आमच्या लाल-काळ्या आईचं हिरवगारं मखमाली वस्त्र फेडून, पर्यावरणाचा सत्यानाश करून आणि किरणोत्सर्गाची भीषण कायमस्वरूपी तलवार टांगती ठेऊन, तुमच्या कॉंक्रिटच्या चकचकीत भिंती उभारण्यासाठी काय, आमच्या हांडामांसाच्या लाल चिखलाचं लिंपण आम्ही करायचं?**

'हॉट केक' सारख्या हातोहात खपणाऱ्या 'विकास' नांवाच्या 'ब्रॅण्डनेम' खाली... ज्ञान पसरविण्याच्या बहाण्यानं अज्ञान पसरविणारे 'करिअरिस्ट अणूशास्त्रज्ञ' अतिश्रीमंत-नवश्रीमंत मूठभरांच्या विकासाच्या मॉडेलसाठी भूमिपुत्रांच जीवन 'भकास' करून टाकणाऱ्या भ्रष्ट राजकारणी नोकरशहांची अभद्र युती आणि या दळभद्री विकासाची मलई खाण्याचा मोह आवरू 'न' शकल्यामुळे, या साऱ्यांच्या आंधळ्या स्वार्थाच्या पालखीचे भोई' होऊ पाहणारी, काही दलाल सुपारीबाज बुध्दीमंत बाळं... यांच्या सडक्या मेंदूतून उद्भवलेला माडबन जैतापूरचा तथाकथित ऊर्जाप्रकल्प, हा केवळ 'अणू-प्रकल्प' नसून, पिढ्यापिढ्यांना घातक संसर्ग पोहोचविणारा 'विषाणू-प्रकल्प' आहे !

कोकणपट्ट्यातीलच ठाणे जिल्ह्यात वेडेवाकडे केमिकल-कारखाने (जागतिकस्तरांवर बंदी असणाऱ्या घातक रसायनांचे उत्पादन करणारे) आणून त्याच्या खाडी किनारपट्टीची,



**प्रस्तावित 'अणूप्रकल्प' दलाल सुपारीबाज बुध्दीमंत बाळं... यांच्या सडक्या मेंदूतून उद्भवलेला माडबन जैतापूरचा तथाकथित ऊर्जाप्रकल्प, हा केवळ 'अणू-प्रकल्प' नसून, पिढ्यापिढ्यांना घातक संसर्ग पोहोचविणारा 'विषाणू-प्रकल्प' आहे !**

**जैतापूरच्या अणूऊर्जाप्रकल्पाला प्राणपणानं विरोध, हे यापुढे अस्तित्व टिकविण्यासाठी संघर्ष करणाऱ्या 'कोकणी-वामना'चं पहिलं पाऊल ठरो, जेणेकरून या कोकण महाराष्ट्रातील अवघं भ्रष्ट राजकीय नेतृत्व कायमचं पाताळात गाडलं जावं, ही ईशचरणी प्रार्थना !!!**

**..... अशातऱ्हेनं 'अणूऊर्जा प्रकल्प' अमानवी (म्हणूनच राक्षसी ऊर्जा भरलेला) असूनही, चला... आम्ही जैतापूर अणूऊर्जा प्रकल्प उभारणीला 'होकार' देण्यास तयार आहोत, पण...पण त्याअगोदर खालील बाबी पूर्ण करा अथवा आमच्या प्रश्नांची उत्तर द्या...!!!**

**१)** प्रथम अमेरिका, फ्रान्स, इंग्लंड, जर्मनी इ. कुठल्याही पाश्चात्यराष्ट्रानं त्यांच्या देशात एकाच ठिकाणी १०,००० मे. वॅट क्षमतेच्या जैतापूर अणुप्रकल्पाप्रमाणे 'अणुप्रकल्प उभारावा, निदान अमेरिकेनं तरी किमान ३५०० मे. वॅट क्षमतेचा (जगातील अणूऊर्जा प्रकल्पाची एकाच ठिकाणची सर्वोच्च क्षमता) अणुप्रकल्प प्रथम उभारावा. (अमेरिकेने शेवटचा अणूऊर्जा प्रकल्प १९७७ साली उभारला होता.)

**२)** जैतापूर अणुप्रकल्पासंबंधित अणूशास्त्रज्ञांनी हजारो वर्षे टिकणाऱ्या महाभयंकर किरणोत्सारी आण्विक कचऱ्याच्या विल्हेवाटीचं निर्धोक व परिपूर्ण तंत्रज्ञान जगजाहीर करावं! (जगात असं तंत्रज्ञान कुठेही परिपूर्णरित्या आजतागायत विकसित झालेलचं नाही!)

**३)** सुधारित तंत्रज्ञानामुळे जैतापूर अणुप्रकल्प अत्यंत सुरक्षित (FAIL SAFE) आहे हे गर्जून सांगण्याअगोदर 'विमानशास्त्र' अत्यंत प्रगत अवस्थेत असल्यामुळे, एकही 'विमान' भविष्यात कोसळणार नाही, अशी हमी शास्त्रज्ञ कधीतरी देऊ शकतील काय? (दुर्दैवी बाब ही की, कालच भारताच्या, जी सॅट-५ पी हा दूरसंचार उपग्रह नेणाऱ्या यानाचा स्फोट झाला!)

**४)** ज्या फ्रान्स देशाच सदैव एकमेव उदाहरण अणूविद्युत ऊर्जानिर्मितीच्या संदर्भात दिल जातं, त्या देशानं 'अरेवा' कंपनीच्या अणूभट्ट्या आम्हाला पुरविण्यापूर्वी... हे जाहीर करावं की, भारतासारखी मुबलक सौरऊर्जा, पवनऊर्जा, बायोमास, प्रचंड क्षेत्रफळ व इतर भौगोलिक अनुकूलता जरी यदाकदाचित आम्हाला लाभली असती तरीही, त्यांनी मोठ्या प्रमाणावर या 'महाप्रलयक्षम' अणूविद्युतऊर्जेचाच ध्यास धरला असता काय ?

**५)** १९८१च्या जून महिन्यात इस्राईलनं बॉम्बहल्ला करून इराकची 'ओसिराक' अणूभट्टी उध्वस्त केली, तशी सुधारित सुरक्षाविषयक तंत्रज्ञानामुळे शत्रूच्या बॉम्बहल्यात जैतापूरची महाकाय अणूभट्टी मात्र कधिही उध्वस्त होणार नाही, अशी लोणकढी थाप मारणाऱ्या अणू शास्त्रज्ञांना असं म्हणायचं आहे का की, १९८१ ते २०१० या प्रदिर्घकाळात शत्रूच्या 'बॉम्बफेक शास्त्र व मारक क्षमता यात काहीच सुधारणा झाली नसेल ?

**६)** डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय राज्यघटना विधीमंडळात सुपूर्द करताना उद्गारले होते की, ''प्रत्येक पिढी एक स्वतंत्र राष्ट्र असते, जसा एका राष्ट्राला दुसऱ्या राष्ट्रावर आक्रमण करण्याचा अधिकार नसतो, तसाच तो कुठल्याही एका पिढीला दुसऱ्या पिढीवर आक्रमक कुरघोडी करण्याचा अधिकार नसतो!'' आमची बेसुमार वाढती लोकसंख्या (विशेषतः अमराठी) आणि त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे या पिढीतल्या धनदांडग्यांची अतिरेकी चंगळवादी-जीवनशैली... यासाठी लागणारी जास्तीची ऊर्जा आम्ही अणूभट्ट्या उभारून मिळवणार, आणि लाखो वर्षे टिकणारा अणूकिरणोत्सर्जन करणारा महाप्रलयंकारी 'आण्विक कचरा' पृथ्वीच्या पोटात ढकलून, पुढच्या पिढ्यांवर त्याच्या भयानक घातकी परिणामांची जबाबदारी सोपवून मोकळं होणार, हे आमच्या पिढीनं पुढील पिढ्यांवर केलेले एक प्रकारचं 'अमानुष आक्रमण' नव्हे काय ?

**७)** परंपरागतरित्या 'फ्रान्स' हा देश अणूचाचण्या (विशेषत: समुद्रीचाचण्या) आणि अणूकचऱ्याच्या विल्हेवाटी संदर्भात आंतरराष्ट्रीय निर्बंध बेधडक धुडकावून लावणारा अत्यंत बेजबाबदार देश आहे. याशिवाय 'अरेवा' ही अणुभट्ट्या बनविणारी कंपनी आख्ख्या युरोपखंडातील राष्ट्रांनी 'ब्लॅकलिस्ट'मध्ये टाकलेली आहे, तसेच तीन भीषण अपघातांमुळे फ्रान्सच्या पर्यावरण मंत्र्यांना त्यांच्या ५८ अणुभट्ट्यांचा किरणोत्सर्ग मोजणी करण्याचा आदेश, या कंपनीला द्यावा लागल्याचे समजते. अशा फ्रान्स देशाची आणि त्यांच्या 'अरेवा' कंपनीची आम्ही 'तळी' उचलणार आहोत की, आमच्या कोकणाची 'तिरडी' खांद्यावर घेणार आहोत?

**८)** रशियाचे अध्यक्ष तत्कालिन मेदवेदेव यांनी भारतीय नागरी अणूदायित्व कायद्याअंतर्गत अणूसाहित्य पुरवठादारांना आण्विक अपघात झाल्यास जबाबदार धरून नुकसान भरपाई देण्यास बांधिल केल्यामुळे, तामिळनाडूतील 'कुडकुलम' येथे दोन अधिक अणूभट्ट्या उभारण्यास नकार दिला. याचाच अर्थ रशियाचे अध्यक्ष, रशियाचे अणूशास्त्रज्ञ 'आण्विक अपघाताची शक्यता निश्चितपणे गृहीत धरतात!. तर आमचे अणूशास्त्रज्ञ अणुभट्ट्यांच्या निर्धोकतेची छातीठोकपणे ग्वाही देतायत. आमचे अणूशास्त्रज्ञ हे रशियन अणूशास्त्रज्ञांपेक्षा फारच अधिक बुध्दिमान-सक्षम आहेत, असं समजायचं की... ते या पृथ्वीवरील 'ब्रह्मा-विष्णू-महेश' आहेत, असं समजायचं?

**९)** महाराष्ट्राचे तत्कालिन मुख्यमंत्री म्हणाले होते, त्याप्रमाणे भारतातील २० अणुभट्ट्यांत गेल्या २० वर्षांत एकही अपघात झालेला नाही असं म्हणता, मग ८ ऑगस्ट २०१० च्या 'THE WEEK' च्या अंकात माजी पंतप्रधान स्व. इंदिरा गांधी, तारापूरच्या अणूभट्टीत सतत होणाऱ्या लहानमोठ्या घातकी अणूकत्सर्जनामुळे, ती अणूभट्टी कायमची बंद करून टाकण्याच्या निर्णयाप्रत आल्या होत्या, याची पुराव्यासह सप्रमाण केलेली मांडणी, खोटी किंवा खोडसाळ होती, असा कुणाचा दावा आहे काय?

**१०)** इतर प्रांतीय लोक आक्रमक स्वभावाचे व राजकीय दृष्ट्या अधिक सजग (उदा. प. बंगाल मधील हरीपूर येथील नियोजित अणुप्रकल्प स्थानिक बंगाली जनतेनं हाणून पाडला) तर तुलनेने महाराष्ट्रीयन लोक, विशेषतः कोकणी माणसं, शांतताप्रिय-सोशिक व पापभीरू वृत्तीचे, त्यामुळे इतर अनेक तांत्रिक बाबी विरोधात असूनही (उदा. जैतापूर- माडबन येथील भूकंपप्रवण क्षेत्र, हल्लीच तेथील जमिनीला पडलेली प्रचंड मोठ्या लांबीची भेग, विपुल भू व समुद्री जैवविविधता, प्रकल्पस्थळाची समुद्रतळापासूनची सरासरी ८० फूट उंची, वीजवहनासाठी करावी लागणारी प्रचंड जंगलतोड इ.) अशा संभाव्य प्रलयकारी अणूऊर्जा प्रकल्पासाठी मोकळी असलेली भारताची पूर्व किनारपट्टी सोडून, पश्चिमेची 'कोकण किनारपट्टीच' योग्य वाटली ना? शिवाय झालाच उठाव, तर कोकणी माणसाची मुस्कटदाबी करायला स्थानिक सरंजामदारी राजकारणी हाताशी आहेतच, असं नव्हे काय?

**११)** 'डिलिमिटेशन्-ॲक्ट्' मुळे ग्रामीण भागातील आमदार/खासदारांची संख्या शहरी लोकसंख्येच्या फुगवट्याच्या पार्श्वभूमिवर तुलनेनी खूपच घटल्यामुळे विविध विकास प्रकल्पांच्या बुरख्याआड ग्रामीण जनतेची आरंभलेली ही, सरसकट मुस्कटदाबी व क्रूरथट्टा नव्हे काय? की, हे करण्यासाठीच 'डिलिमिटेशन्-ॲक्टू'चा डाव रचला गेला ?

**१२)** हिमालयाच्या रक्षणासाठी सह्याद्रीनं धावून जाण्यापासून ते दक्षिण-उत्तरेतल्या परप्रांतीय लोंढ्यांचा असह्य भार आपल्या छाताडावर आजवर पेलून धरण्यापर्यंत या महाराष्ट्रानं नको एवढा त्याग, या देशासाठी या अगोदरच केलेला आहे, आता अजून कुठला हा त्याग करून, कोकणाची 'होळी' पेटवून भारतात इतरत्र 'दिवाळी' साजरी करायचीय?

***कोकणी माणसा,***
***खामोश मिजाजी तुझे जीने नही देगी !***
***इस दौर मे जीना है, तो कुहरम मचा दे....!!!***

त्यातल्या मासेमारीची तसेच मिठाच्या व भाताच्या 'आगरां'ची वाट लाऊन, स्थानिक आग्री कोळ्यांना व दलित-मुसलमानांना उध्वस्त करणं केव्हाचचं पार पडलयं कित्येक कारखाने तर धड एका पिढीलाही नोकरी 'न' देताच पुढे बंद करण्यात आले... मात्र जाताना आमची जमीन व पाणी कायमचं नासवून गेले. एकेकाळी खाडी दर्याचा 'राजा' असणारा आमचा आगरी-कोळी भूमिपुत्र तरुण आता फडतूस 'कंत्राटी-नोकरीचा' हाती कटोरा घेऊन फिरतोयं! जर वेळीच सावध होऊन कडवा प्रतिकार केला नाही तर, 'कोकणी-तरूण' देखील 'विनाशकारी विकासा'ची भळभळती जखम माथी घेऊन, परशुरामभूमित 'अश्वत्थाम्या सारखा निरंतर फिरत राहील, हे दुर्दैवानं अटळ प्राक्तन आहे!

**जेव्हा सह्याद्रीच्या कडेकपारीला तुमच्या आधुनिक संस्कृतिचा स्पर्श होण्याची, साधी स्वप्नं पाहण्याची देखील कोणी हिंमत करणं शक्य नव्हतं, त्या आदिम काळापासून रौद्र-सुंदर निसर्गाशी, हिंस्त्र श्वापदांशी, साप-विंचूकाट्याशी, सोसाट्याच्या थंडीवाऱ्याशी, थरकविणाऱ्या लाटांशी झुंजत कोकणी गडी पिढ्यान्पिढ्या जगतं आलाय..... आणि आता अत्याधुनिक संसाधने हाती आल्यावर, या विनाशकारी विकासकांची पाशवी नजर आमच्या निसर्गसुंदर कोकणावर पडलीयं?... पण या तथाकथित विकासाचं 'दशावतारी' सोंग धारण केलेल्यांना आम्हाला गर्जून सांगू द्या की, आता 'तंबोरा'वाल्या नारदमुनींसारखं ''नारायण... नारायण...'' असं आम्ही म्हणणारं नाही, तर ढोंगी राजकारण्यांची भंबेरी उडवणारे, ''अणुप्रकल्प रद्द झालेच पाहिजे''... असा 'नारा' लावणार !!!**

तुमच्या दृष्टीनं निसर्गसंपन्न कोकणातला आमचा जन्म केवळ एक 'अपघात' असल्यामुळे, तुम्ही अस्तित्वाचा 'घात' करण्यासाठी सरसावला असलात, तर खबरदार! कोकणाची लाल-काळी माती आणि निळाशार समुद्र आमचा 'श्वास' आहे, त्याला तुमच्या आसुरी जबड्यातला 'घास' आम्ही बनू देणार नाही.... नाही म्हणजे नाहीच!

जैतापूरच्या अणूऊर्जाप्रकल्पाला प्राणपणानं विरोध, हे यापुढे अस्तित्व टिकविण्यासाठी संघर्ष करणाऱ्या 'कोकणी-वामना'चं पहिलं पाऊल ठरो, जेणेकरून या कोकण महाराष्ट्रातील अवघं भ्रष्ट राजकीय नेतृत्व कायमचं पाताळात गाडलं जावं, ही ईशचरणी प्रार्थना !!!

***- राजन राजे*** (अध्यक्ष: धर्मराज्य पक्ष)

# श्रीगणेशाचं निसर्ग-पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून महत्त्व व गणेशोत्सवाची सद्यस्थिती......

**संत ज्ञानेश्वरांनी ओंकाराच्या स्वरुपात, संत तुकारामांनी.... ''अकार तो ब्रह्मा, उकार तो विष्णू, मकार महेश जाणियेला'', असे म्हणून 'ब्रह्माविष्णूमहेश' या तीनही प्रमुख देवतांचं 'गणेश', हे जन्मस्थान असल्याची प्रचिती दिली; तर, समर्थ रामदासांनी... ''गणाधीश जो ईश सर्वगुणांचा'', असं मनाच्या श्लोकाच्या शुभारंभालाच म्हणतं, श्रीगणेशाचं स्तवन केलयं! श्रीगणेशाचं गुणवर्णन करण्यात प्राचीन काळातील वेद, उपनिषदे, पुराणेही मागे नाहीत.**

हे सगळं असं असलं तरी, या दैवताचं महत्त्व निसर्ग-पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून फार फार आगळवेगळं व अतिशय महत्त्वाचं आहे!

ते असं की, श्रीगणेश दैवत हे, ''माणूस आणि हत्ती'' (गज म्हणून गजानन!) या दोहोंतून तयार झाल्याची आख्यायिका, खरतर 'समष्टि'च्या हिताच्या दृष्टीनं आपल्याला खूप काही सांगून जातेयं... पण लक्षात कोण घेतो? श्रीगणेशानं जणू 'मनुष्य आणि प्राणी'मात्रातला एकप्रकारे 'भेद'चं मिटवून टाकत, सजीवमात्रांचं एक 'अद्वैत' वा 'एकत्व' पेश केलयं. 'माणुसकी आणि भूतदया' यांना जणू एकाच पातळीवर आणलयं. सर्व 'भूतां'मध्ये भगवंताचा 'वास' आहे, याचा प्रखर संदेश दिलायं.

भारतीय आध्यात्मिक-तत्त्वज्ञानानं यातून आपल्याला जे अवघ्या सजीवसृष्टीतलं 'एकत्व' दाखवलयं, ते आपण साफ विसरुन गेलेलो आहोत. सरतेशेवटी, कुठलाही 'सजीव'च काय, अगदी 'निर्जीव'सुद्धा एकाच प्रकारच्या मूळ तत्त्वांनी बनलेले असतात.... प्रोटॉन्स्, इलेक्ट्रॉन्स, न्यूट्रॉन्स्, बोसॉन्स् वगैरे वगैरे. फरक फक्त 'चेतनेच्या पातळी'तलाच (flow and level of consciousness) असतो तेवढाचं!

**नोबेल पारितोषिक विजेते जगदीशचंद्र बोस एकदा, ''वनस्पतीदेखील 'सजीव' असतात व त्यांच्यावरही माणसांवर होतो तसाच, विषाचा परिणाम होतो'', हा प्रयोग करुन दाखवण्यासाठी काचेच्या भांड्यातून सेवकाने आणलेले विष, त्यांनी प्रयोगातील वनस्पतीच्या मुळावर ओतले.... मात्र, अपेक्षेप्रमाणे वनस्पतीवर कुठलाही विपरित परिणाम न झाल्याचे पाहून जगदीशचंद्र बोस गडबडून गेले व प्रयोगासाठी उपस्थित शास्त्रज्ञ त्यांना हसू लागले. पण, क्षणभरच गोंधळून गेलेल्या जगदीशचंद्र बोसांनी, दुसऱ्याच क्षणी तो भांड्यातील विषाचा उरलासुरला द्राव, स्वतः आत्मविश्वासाने पिऊन टाकला व म्हणाले की, ''जर, या विषाचा वनस्पतीवर परिणाम होत नसेल तर, खात्रीने माझ्यावरही होणार नाही''. नंतर कळलं की, त्या सेवकाच्या हातून चुकून विषाच्या आणि पाण्याच्या भांड्यांची अदलाबदल झालेली होती. त्यानंतर, पुन्हा नव्यानं करण्यात आलेला तो प्रयोग, यशस्वीरित्या संपन्न झाला आणि उपस्थित सगळेच शास्त्रज्ञ अचंबित झाले. मुद्दा पुन्हा तोच ''सजीवसृष्टीप्रतिच्या एकत्वाचा आणि सम्यकभावाचा'' .....जो, श्रीगणेशाच्या संरचनेतच मुळापासून अंतर्भूत आहे!**

औद्योगिक-संस्कृतितील 'कार्बनकेंद्री, रासायनिक-आण्विक प्रदूषणकेंद्री' विकासाचं प्रारुप आणि संवेदनाशून्य चंगळवादी-संस्कृतिचा प्रादुर्भाव, यामुळे आपण उर्वरित सजीवसृष्टीपासून स्वतःला शब्दशः साफ तोडून टाकलयं. जेव्हा, आम्ही स्वतःला 'निसर्गप्रेमी' म्हणतो, तेव्हा हेचं 'निसर्गापासूनच तुटलेपण' अधोरेखित होत असतं. त्यामुळेच, आज जगावर निसर्ग-पर्यावरणीय महासंकटं कोसळू लागलीयतं आणि अवघ्या सजीवसृष्टीचं अस्तित्वच निसर्गातील विघातक स्वरुपाच्या 'मानवी-हस्तक्षेपा'मुळे गंभीररित्या धोक्यात आलेलं आहे!

**जेव्हा जेव्हा, गणराया येतो.... तेव्हा तेव्हा तो हा, ''सजीवांच्या एकत्वाचा'' महान संदेश घेऊन येत असतो. श्रीगणेश, हे एकमात्र दैवत, ज्याची आपण 'प्राणप्रतिष्ठापना'ही करतो आणि यथावकाश**



**'विसर्जन'ही करतो! जीवन 'क्षणभंगुर' आहे... ते आज आहे, उद्या नाही; हा, अवघ्या मानवजातीच्या (जिला 'कर्मस्वातंत्र्य' आहे) अहंकाराला-अहंमन्यतेला त्यात सूचक व गर्भित इशारा आहे. दुसऱ्या अर्थाने ''सगुण आणि निर्गुण भक्ति''चा प्रत्यय एकाचवेळी देणारं, हे अदभूत दैवत आहे.**

दुर्दैवानं एकतर तथाकथित बुद्धिमंत बाळं, या दैवताची तार्किक व बौद्धिक चिरफाड करण्यात स्वतःला धन्य समजतात.... किंवा, अतिश्रद्धाळूपणाच्या प्रभावाखाली सर्वसाधारणपणे इतरेजन, या महन्मंगल दैवताच्या महान 'निसर्ग-पर्यावरणपूरक संदेशा'ची हेळसांड तरी करत रहातात.

हे गणेशरुपी अलौकिक दैवत पुजणारी, वनस्पतीपूजन (तुळशीपूजन, वटपौर्णिमा इ.), प्राणीपूजन (बैलपोळा, नागपंचमी इ.) करणारी निसर्ग-पर्यावरणस्नेही 'महन्मंगल मराठी-संस्कृति'ही देखील कालपरत्वे, पर्यावरणासारखीच भयंकर प्रदूषित व्हायला लागलीयं.... सार्वजनिक-गणेशोत्सव तर, विकृतीनं भरलेले उघडानागडा व्यवसाय बनलेत. पावसाळ्यात उदंड उगवणाऱ्या कावळ्याच्या छत्र्यांसारखे, सार्वजनिक-गणेशोत्सव गल्लोगल्ली प्रतिवर्षी वाढू लागलेतं... ज्यात, गांभीर्याचा वा पावित्र्याचा लवलेशही नसतो. पूर्वी फक्त श्रीगणेशाच्या विसर्जनाच्या वेळेसच मिरवणूका निघायच्या.... आता आगमनाच्याही निघायला लागल्यात. जगणं चारही बाजुंनी एवढं असुरक्षित, मेटाकुटीचं व दुःखदायक बनल्यानंतरही... या सर्वस्व गमावलेल्या मराठी-तरुणाईला, व्यवस्थेविरोधात 'विद्रोह' करण्याऐवजी ही अशी, दहीहंडी-गणेशोत्सवासारखी औटघटकेची मौजमजा सुचत असेल, तर ते एक मोठ्ठ आश्चर्यच आहे! कुठून येते ही क्षणिक, उसनी व आत्मघातकी ऊर्जा? .....हे इतकचं नव्हे तर, निसर्ग-पर्यावरण संरक्षण-संवर्धनाचा संदेश देणाऱ्या, या दैवताचा सण-उत्सव.... **आपण प्लॅस्टर ऑफ पॅरीसच्या मूर्ति, सजावटीसाठी थर्माकोल व घातकी कृत्रिम रंगांचा वापर, गणेशमूर्तिंच्या उंचीची वेडीवाकडी स्पर्धा, ध्वनिप्रदूषण, वर्गणीच्या नांवाखाली खंडण्या, गुटखा-मावा-तंबाकूच्या जाहिराती, जुगारासारखे खेळ, मिरवणुकीतील टपोरीगिरी व दारु पिऊन धिंगाणा, अस्वच्छता इ. मुळे उलट सर्वच दृष्टीकोनातून भयंकररित्या 'प्रदूषणकारी' बनवून टाकलायं.**

**.......ही या श्रीगणेश दैवताशी आपण केलेली 'प्रतारणा'च नव्हे; तर, श्रीगणेशाप्रति केलेला अक्षम्य 'अपराध' आहे!**

या बाबी आता एवढ्या थराला गेल्यात की, सार्वजनिक-गणेशोत्सवांचं करायचं तरी काय, अशी वेळ येऊ घातलीयं. पण ज्या राजकारण्यांनी, लो. टिळकांच्या प्रबोधनाच्या प्रेरणेविरोधात जाऊन, भोळसट सामान्य मराठी-माणसांना या गणेशोत्सवासारख्या सार्वजनिक-सणउत्सवांमधून 'अफूची मात्रा' पाजत... घातकी 'ग्लानी' पसरवत... त्यांची ('स्मार्ट' नसलेल्यांची!) लूटमार व 'स्मार्ट-शहरां'तून हकालपट्टी चालवलीयं, तो प्रस्थापित राजकारणीवर्ग, याबाबत काहीही करणं केवळ अशक्य आहे. त्यांना हे असे कार्यक्रम, सामान्यजनांना क्षणकाळ भुलायला व झुलायला लावून, जगण्याच्या मूलभूत प्रश्नांपासून व व्यवस्थाविरोध करण्यापासून, दूर दूर राखण्यासाठी अत्यावश्यकच आहेत. अशा सार्वजनिक सण-उत्सवांना, बड्या बड्या सेलेब्रिटींच्या उपस्थितीचं प्रयोजन, तेच तर असतं.

.......या दुष्टचक्रातून मुक्ततेसाठी, आता एकतर 'सर्वोच्च न्यायालया'चा आधार घेऊ पहाणं किंवा 'धर्मराज्य पक्ष' सत्तेवर येण्याची प्रतिक्षा करणं, एवढचं 'जागृत' जनतेच्या हाती राहीलं आहे.

धन्यवाद......

**जय महाराष्ट्र । जय हिंद ।।**

**.....*राजन राजे* (अध्यक्षः धर्मराज्य पक्ष)**

## २६ एप्रिल, २०११ – 'चेर्नोबिल आण्विक अपघाताला, २५ वर्षे पूर्ण झाल्या निमित्ताने लिहिला गेलेला लेख...

# "अणूविद्युत... निसर्गाशी द्यूत! अणूविद्युत... मृत्यूदूत!!"...

"You can never Master Nature.... Nature rules us, the undiluted truth we understand, if ever, we peep into the TOMB of the dead moments of Chernobyl-Fukushima into the WOMB of the unborn future moments of Jaitapur!!!"...

**''आम्ही अंधारात राहायला तयार आहोत...पण तो आम्हाला जाळणारा किरणोत्सर्जनाचा 'अणू-प्रकाश' नको!!!''....**

**ज्या जपानचं अभिमानानं आमचे शासक व अणूशास्त्रज्ञ जैतापूर अणूप्रकल्पाच्या भन्नाट समर्थनासाठी उदाहरण पेश करत होते, त्याच जपानच्या राजधानी टोकियोसहित सर्व शहरांच्या रस्त्यांवर फुकुशिमाच्या आण्विक अपघातापश्चात दिसणारा हजारोंच्या निदर्शकांचा हा संतप्त आक्रोश आहे! ज्याचं दुसरं उदाहरण दिलं जातं त्या फ्रान्स देशातली परिस्थिती याहून वेगळी नाही.**

बरं, हा सारा विरोध फुकुशिमाच्या आण्विक अपघाताच्याच पार्श्वभूमिवर उभा राहिलायं असं नव्हे, तर जपानमध्ये १९९९ व २००४ साली झालेल्या अपघातांमध्ये शेकडोंना किरणोत्साराची गंभीर बाधा झाली होती. तिथपासूनच सुरु झालेल्या अणूऊर्जेच्या विरोधाची धार, फुकुशिमाच्या आण्विक अपघातामुळे टिपेला पोहोचलीयं इतकचं! भूकंप-त्सुनामीच्या नैसर्गिक आपत्तिनंतर फुकुशिमा-दायची सारख्या निम्नश्रेणीतल्या अणूभट्ट्यांमधील अणूउत्सर्जन रोखताना (अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, इंग्लंड इ. अनेक पाश्चात्य देशांचं सहकार्य असतानाही) शिस्तबध्द व अतिप्रगत जपानची झालेली असहाय्यस्थिती, रोज विविध टी.व्ही. चॅनेल्सवरून पाहताना जैतापूरसारख्या जगातल्या संभाव्य सर्वोच्च क्षमतेच्या अणूभट्ट्यांशी संबंधित कुठलाही अपघात घडल्यास आपल्या देशातल्या आरपार भ्रष्ट व अकार्यक्षम व्यवस्थेची काय दशा होईल, याची कल्पनादेखील अंगावर काटा उभा करते! मानवाने विकसित केलेल्या अनेकविधं तंत्रज्ञानांपैकी 'अणूतंत्रज्ञान' हे, हजारो-लाखो वर्षे प्रदीर्घकाळ टिकणारी अतिभीषण संहारकता असणारे, एकमेव तंत्रज्ञान आहे... जेवढी अणूप्रकल्पाची क्षमता मोठी, तेवढा धोका देखील मोठा. जैतापूरमध्ये तर सहा अणू-रिॲक्टर्स ओळीनं मांडून ठेवलेले असणार (प्रत्येकी १६५०मे.वॅ. क्षमता) म्हणजे एखाद्या रिॲक्टरमधून कुठल्याही कारणाने अपघाती किरणोत्सर्जन सुरू झालं, तर इतर रिॲक्टर्सना त्याची झळ पोहोचू नये, यासाठी तिथपर्यंत जाणं देखील खूप कठीण होणार-

**जैतापूर-माडबन हा भौगोलिकपट्टा भूकंपप्रवण क्षेत्रात मोडतो** (seismic zone-4, indicating high damage prone, from where 3 neotectonic-faults traverse viz. west-coast fault, chiplun fault warana fault-ref. G.S.I. publications, Seismic Tectonic tlas Of India it's environs- 2000) **व तेथे गेल्या वीस वर्षात सातत्याने ४ ते ६.३ क्षमतेचे मोठे भूकंप व स्वाभाविकच मोठी जिवितहानी झालेली आहे, हे आपल्याला ज्ञात आहेच (वेंगुर्लेकर समितीनं सुस्पष्टपणे नमूद केल्याप्रमाणे कुठलाही 'अणूप्रकल्प' हा भूकंपप्रवणता क्षेत्र-१ किंवा क्षेत्र-२ मध्येच येऊ शकतो, ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे!).**

**फुकुशिमाच्या पार्श्वभूमिवर केवळ भूकंप-त्सुनामीचाच संभाव्य धोका, हे एकमेव जैतापूरसारख्या अणूप्रकल्पाच्या कडव्या विरोधाचे कारण नव्हे, या विरोधाबाबतची शास्त्रीय भूमिका समजावून घेताना, खालीलपैकी अनेक त्याहीपेक्षा गंभीर व प्रबळ कारणांचा मागोवा घ्यायला हवा ...**




१) राजकारण्यांची विश्वासार्हता पार रसातळाला केव्हाचं गेलीयं, पण राज्यकर्ते आणि धनदांडग्यांच्या चरणी बुध्दी गहाण ठेऊन आपल्या आत्म्याचा बाजार मांडणाऱ्या.... 'ज्ञान पसरविण्याच्या बहाण्याखाली अज्ञान पसरविणाऱ्या' काही शास्त्रज्ञांसारख्या बुध्दिमंत बाळांवर आंधळा विश्वास टाकण्याचे दिवस देखील फार पूर्वीच संपलेले आहेत. आता 'सरस्वती' केवळ 'लक्ष्मी'ची दासीचं झालीयं एवढचं नव्हे, तर थेट 'गुलाम' झालीयं हे फार मोठं आपलं दुर्दैव आहे (Indian Scientists are most likely to cheat... 'R Grant Steen', the Us-based consultant- Hindustan Times dt. 26-11-10)... सांगा,

अ) सजीवसृष्टी संरक्षक ओझोनच्या थराला छिद्रे कोणामुळे पडली?

ब) हवा, जमीन, पाणी, नदी-नाले कोणामुळे प्रदूषित झाले?

क) जागतिक-तापमान वाढ ही कोणाची 'देणगी' आहे? त्यामुळे नजिकच्या भविष्यात महासागरांच्या पाण्याच्या पातळीत होऊ घातलेल्या वाढीमुळे माजू शकणाऱ्या हाहाःकाराला जबाबदार कोण? येत्या ५० वर्षात (category-5) वादळी वाऱ्यांचा वेग वर्षानुवर्षे थोडा-थोडा वाढत (Research Team-ustralian National University in Melbourne) एवढा प्रलयंकारी होऊ शकतो की, त्यांच्या वाटेतील ९० हूनही अधिक बांधकामे (उदा. इमारती वगैरे) उध्वस्त करण्याची राक्षसी क्षमता त्यांच्यात असू शकेल (Ref. Mark Donelan-an oceanographer at the University of Miami in Florida, T.O.I. dt. 27/03/2011) या अशा संभाव्य विध्वंसाचं प्राक्तनं कोणामुळे ओढवलयं? (.....एप्रिल-२०११च्या शेवटच्या आठवडयात अमेरिकेच्या दक्षिणभागाला बसलेल्या भीषण चक्रिवादळाच्या तडाख्यातील वाऱ्यांचा वेग, गेल्या शतकातील सर्वोच्च असल्याचं अमेरिकी वेधशाळेचं म्हणणं आहे, हे येथे आवर्जून ध्यानात घेतलं पाहिजे!)

ख) अवघ्या चराचरसृष्टीच्या अस्तित्वाचा गाभा असलेल्या (ज्याला आपण ८४ लक्ष योनी म्हणतो) जैविक-बहुविधतेचे मारेकरी कोण?

कोकणात एक म्हणं आहे, ''एक कोंबडं झाकलं ठेवण्यासाठी, दुसरं कोंबडं उघडं करावं लागतं!''.... तद्वतचं सगळे जैतापूरप्रकल्प समर्थक अणूशास्त्रज्ञ एका सूरात दगडीकोळशाच्या इंधनावर चालणाऱ्या औष्णिकभट्ट्या, त्यातून बाहेर पडणाऱ्या $CO/CO_2$, नायट्रोजन ऑक्साईड्स् व राखेमुळे पर्यावरणाला कशा घातक आहेत, हे फिल्मीस्टाईलने रंगवून सांगताहेत.... असं पर्यावरणीय नुकसान होण्यापूर्वी त्याबाबतची गंभीर सूचना आमजनतेला आमच्या धोरणकर्त्यांनी व शास्त्रज्ञांनी फार पूर्वीच द्यायला हवी होती, ती त्यांनी वेळीच का दिली नाही? असे औष्णिकऊर्जाप्रकल्प उभारताना जसे कोळशाच्या भट्टीचे फक्त गोडवेच गायले गेले, त्याचप्रमाणे सध्या अणूभट्ट्यांचे गोडवे गाण्याचे कार्यक्रम विविध स्तरांवर अथक चालू आहेत... पण 'अंदरकी बात' फार वेगळी व भयानक आहे!!!

नजिकच्या भविष्यात 'मिथेन क्लॅथ्रेट' (Methane Clathrate) हे बर्फासारखे दिसणारं दगडी खनिज किंवा पाण्यातला 'हायड्रोजन' सोप्या व कमी खर्चिक पध्दतीनं (उदा. मोलिबडेनम धातूच्या कॅटॅलिस्टचा वापर करून वगैरे) ऊर्जानिर्मितीसाठी वापरात आले किंवा अन्य नवं शास्त्रीय संशोधन (e.g. Galactic Source of Energy etc.) समोर आलं, तर तेव्हाचे 'संबंधित शास्त्रज्ञ' अणूऊर्जा किती खर्चिक-धोकादायक व पर्यावरणाला घातक आहे व नवं तंत्रज्ञान कसं अधिक सुयोग्य आहे, याची शास्त्रीय प्रवचनं एखाद्या कसलेल्या 'सेल्समन्'सारखी जागोजागी देत फिरतील. तेव्हा, आपला-आपल्या भावी पिढ्यांचा आणि पृथ्वीवरील अवघ्या सजीवसृष्टीच्या अस्तित्वाचा, ऊर्जा वापरासंबंधितील निर्णय, केवळ राजकीय मंडळींवर वा शास्त्रज्ञांवर सोपवून मोकळं होऊ नका!

२) अणूऊर्जा समर्थकांकडून केले जाणारे दावे निखालस खोटे असून अणूऊर्जा (अ) स्वच्छ नाही, (ब) सुरक्षित तर

नाहीच वा (क) स्वस्तही नाही!

(अ) अणूऊर्जा स्वच्छ नाही: 'औष्णिक ऊर्जकेंद्रांतून मोठयाप्रमाणावर कार्बनउत्सर्जन होत असल्यानं जागतिक तापमानवाढीच्या दुष्टचक्राला चालना मिळते'....असे सध्या एकासूरात सर्व जैतापूरप्रकल्प समर्थक अणूशास्त्रज्ञांचं राग आळवणं सुरु आहे! एका अभ्यासगटाच्या म्हणण्यानुसार 'जगातील सगळे औष्णिक ऊर्जाप्रकल्प बंद करुन तेवढयाच क्षमतेचे अणूऊर्जाप्रकल्प उभारले, तरी जागतिक कार्बनउत्सर्जनाचे सध्याचे प्रमाण घटण्यात अतिशय नगण्य ओशी मदत होईल'...याचाच अर्थ कार्बन उत्सर्जनाचे खरे दुखणे वेगळेचं आहे!

प्रत्यक्ष अणूभट्टीतील अणूभंजन (tomic Fission) प्रक्रियेत कार्बनउत्सर्जन 'शून्य' असलं तरी, अणूऊर्जेसाठी आवश्यक युरेनियमचं उत्खनन, त्याचे संपृक्तिकरण (Enrichment), अणूभट्टीच्या स्थळापर्यंतची सुरक्षित वाहतूक, अतिभव्य व अतिमजबूत अणूप्रकल्प उभारणी, अणूकचऱ्याची साठवण व विल्हेवाट, अणूभट्ट्या सुरक्षितरित्या मोडीत काढणे... या सर्व प्रक्रियेत होणारे तुलनात्मक 'कार्बन-उत्सर्जन' मोजले, तर ते औष्णिक-प्रकल्पांच्या आसपासचेच ठरावे. याव्यतिरिक्त युरेनियम संपृक्तिकरणाच्या प्रक्रियेत क्लोरोफ्ल्युरोकार्बन (C.F.C.) हा 'पर्यावरणसंरक्षक ओझोनच्या थराला भगदाड पाडणारा' अत्यंत घातक 'ग्रीन हाऊस' वायू (ज्याची सूर्याची उष्णता शोषण्याची क्षमता $CO_2$ च्या तुलनेत १० ते २० हजारपट असते) मोठ्या प्रमाणावर बाहेर पडतो. शिवाय अणूऊर्जाकेंद्रे जेवढया मात्रेची विद्युतऊर्जा तयार करतात, त्याच्या तिप्पट प्रमाणात उष्णता निर्माण करतात. निसर्गतः 'अणूकेंद्रकां'च्या 'बाटली'मध्ये कोंडला गेलेला हा अचाट ऊर्जेचा 'ब्रम्हराक्षस', अणूभंजनाच्या प्रक्रियेव्दारे 'बाटली'बाहेर काढल्यानंतर जी अतिप्रचंड उष्णता समुद्रीपाण्यात व वातावरणात सोडली जाते, त्यामुळे वैश्विक तापमानवाढीवर काहीच परिणाम होत नसेल?

यापेक्षाही धक्कादायक बाब ही की, अणूविद्युतप्रकल्प तुलनेनं अतिप्रचंड प्रमाणात समुद्रीजल अणूभट्टयांच्या शीतिकरणासाठी वापरतात तेव्हा त्या पाण्यातील, तसेच हे उच्च तपमानाचं रसायनमिश्रित पाणी पुन्हा समुद्रात सोडल्यानंतर आजुबाजुच्या समुद्रीभागातील पाण्यामधील समुद्रीशैवाल (Phyto-Plankton) फार मोठयाप्रमाणावर व झपाटयानं नष्ट होतं. सजीवसृष्टीचा तोल सांभाळण्याबरोबरचं वातावरणाला कर्बवायू ($CO_2$) शोषून उलटपक्षी वातावरणात प्राणवायू ($O_2$) सोडण्याचं अतिमहत्वाचं काम 'समुद्रीशैवाल' एवढया मोठयाप्रमाणावर करत असतं की, जरी समजा भविष्यात जगभरातील जमिनीवरील सर्व वृक्ष-वनस्पतिसृष्टि नष्ट झाली तरीही, मानवासहित सगळ्या सजीवसृष्टिला किमान जगण्यापुरता अत्यावश्यक प्राणवायू हे 'समुद्रीशैवाल' पुरवीत राहीलचं! औष्णिक ऊर्जाप्रकल्प वा खनिजतेलावर चालणारी वहाने किंवा उद्योगधंदे यामुळे हवेत होणारे कार्बनउत्सर्जन जेवढं घातक, तेवढंच हवेतील कार्बन मोठयाप्रमाणावर शोषून घेणाऱ्या 'समुद्रीशैवाला'ला नाहीसं करणं.... हे दोन्ही सारखचं घातक! दरदिवशी ५२०० कोटी लिटर पाणी समुद्रातून जैतापूरसारख्या अणूप्रकल्पात खेचून घेतले जाणार असल्यामुळे, एका शास्त्रीय अंदाजानुसार एकपेशीय समुद्रीशैवालांचे ७ ते१० लाख अब्ज पेशीसमूह दररोज नष्ट होतील, एव्हढचं नव्हे तर... त्याच्या दिडपट-दुप्पट संख्येनं 'समुद्रीशैवाल' पेशीसमूह समुद्राच्या आजुबाजुच्या भागातून नष्ट होतील!.... या व अशाच कारणांमुळे विषुववृत्ताच्या वर कर्कवृत्तापलिकडे व खाली मकरवृत्तापलिकडे एकवटलेल्या विकसितराष्ट्रांमुळे, गेल्या ६० वर्षांत जगभराच्या समुद्रातील सुमारे ४०% समुद्रीशैवाल नष्ट झाल्याचा 'नासा'चा दावा आहे!

(ब) अणूऊर्जा सुरक्षित नाही: i) अणूविद्युत प्रकल्प सामान्यस्थितीत चालू असताना नेहमीच त्यातून निम्न-तीव्रतेचा किरणोत्सार (Low Intensity Ionising Radiation) सतत बाहेर पडत असतो (By Venting or Planned Purges). वातावरणातील नैसर्गिक किरणोत्सर्गाच्या मात्रेशी तुलना करता, अणूप्रकल्पातून सातत्यानं बाहेर पडणारा हा किरणोत्सर्ग कमी असला तरी तो अगदी 'नगण्य' आहे, हे भासविण्यासाठी किरणोत्सर्गाच्या मात्रेची आकडेवारी देताना अणूभट्ट्यांपासूनच्या किरणोत्सर्ग-मात्रेला 'देशातील' सर्व लोकसंख्येनं 'भागले' जाते. पण प्रत्यक्षात अणूभट्ट्यांभोवतालच्या मोजक्या लोकसंख्येलाच हा उपद्रव पोहचत असल्याने, खरतरं तेवढ्याचं लोकसंख्येनं भागायला हवं. लाखो वर्षांच्या वाटचालीनंतर मानवजातीनं जे नैसर्गिक किरणोत्सर्गाशी संतुलन साधलयं, त्यात माणसांच्या लुडबुडीमुळे निर्माण होणाऱ्या किरणोत्सर्गाची मात्रा कितीही लहान असली, तरी ती नैसर्गिक किरणोत्साराच्या लाखोवर्षांच्या साधलेल्या संतुलनात पडलेली अधिकची भर असते. अर्थातच आपल्या हे सहजी ध्यानात येईल की, अधिकची मानवनिर्मित किरणोत्सर्गाची मात्रा कितीही नगण्य असली तरीही कधिही पूर्णतया सुरक्षित नसते व ती नैसर्गिक मात्रेतील अधिकची धोकादायक भर ठरते! (No Dose of radiation is 'Safe', 'Permissible' does not mean 'Safe' every new radiation gets added up with natural back-ground Radiation i.e. Solar plus terrestrial gives 'Cumulative-Effect'!) **अखंडितपणे उत्सर्जित होणारे-आयनीकरण करू शकणारे अल्फा, बिटा व गॅमा किरण हे दृश्य नाहीत, त्यांना वास नाही, ते भाजत नाहीत वा गुदमरवून टाकत नाहीत, त्यामुळे डोळे चुरचुरत नाहीत वा त्वचेला खाज येत नाही... त्यामुळे त्यांची बाधा होताना कळत नाही. तसेच विशिष्ट मर्यादेपर्यंत त्यांचा परिणाम तत्काल किंवा नजिकच्या भविष्यात होत नाही. कधि-कधि तो परिणाम घातक जनुकिय बदलांच्या स्वरुपात (उदा. कॅन्सर, व्यंग, अपंगत्व, नपुंसकता, गर्भपात इ.) पुढील काही पिढ्यांमध्ये संक्रमित होऊन वेगवेगळ्या टप्प्यांवर प्रकट होतो. (उदा. उंदरांवरील प्रयोगात अमेरिकेत १९५४ साली उंदरांच्या सातव्या-आठव्या पिढीत किरणोत्सारामुळे जन्मजात विकृती उद्भवल्याचे आढळले. मग २५,००० अब्ज पेशींनी बनलेला, उंदराहूनही खूपच गुंतागुंतीची रचना, दीर्घआयुमर्यादा व दीर्घपुनरुत्पादन काळ असलेल्या असलेल्या माणूस नांवाच्या प्राण्यात... अशा बिघाडासाठी किती आदर्श-स्थिती आहे, याची फक्त कल्पना करा.)**

ii) अणूविद्युत प्रकल्पांमधून कोणत्याही कारणाने (उदा. मानवी चूक, तांत्रिक बिघाड वा अपघात, भूकंप-त्सुनामीसारखी नैसर्गिक आपत्ती किंवा युध्दजन्य घातपाती वा दहशतवादी कृत्य इ.) मोठ्या प्रमाणावर किरणोत्सार झाल्यास फार मोठा भू-प्रदेश बाधित होऊन ते मानवी वस्तीसाठी शेकडो वर्ष हानिकारक ठरतो. अशातऱ्हेनं अशा आण्विकअपघातात महाभयंकर संहाराच्या स्थळाचा परिघ आणि काळाच्या कक्षा 'अमर्याद' बनतात, त्या केवळ किरणोत्सारामुळेच (किरणोत्साराचा अर्धायुकाल - Half Life युरेनियम २३५- ७० कोटी वर्षे, युरेनियम २३८- ४.५ अब्ज वर्षे, थोरियम २३१- १४ अब्ज वर्षे)! उदा. मानवी चूकीमुळे घडलेल्या चेर्नोबिलच्या अपघातात तत्काळ बळी काही लोकांचेच गेले असले, तरी वर्षभरातच हजारो लोक कॅन्सरसारख्या व्याधिंमुळे मृत्युमुखी पडले. दुर्घटनेच्या विसाव्या स्मृतिदिनी (वर्ष-२००६) युनोचे सरचिटणीस 'कोफी अन्नान' म्हणाले की, 'आजही सुमारे ७० लाख माणसे किरणोत्साराने बाधित आहेत, त्यापैकी ३० लाख लहान मुले आहेत आणि अशी शक्यता आहे की, ही मुलं प्रौढावस्था गाठण्याआधीच मृत्युमुखी पडतील!' चेर्नो बिल आण्विकअपघातामुळे सुमारे ५ ते १० कोटी 'क्यूरी' किरणोत्सारी द्रव्यांचे (स्कॅन्डियम-४६, स्ट्राँशियम-९०, कोबाल्ट-६०, सिशियम-१३७ इ.) लोट वातावरणात सोडले गेल्याने बेलारुस, युक्रेन, रशिया, पश्चिम युरोपपर्यंत आकाशमार्गे वाऱ्यासोबत किरणोत्सर्ग पोहोचला. गवतावाटे चरणाऱ्या गाईंपर्यंत हा अणूसंसर्ग पोहोचल्याने पोलंडपासून ब्रिटनपर्यंत नव्हे, तर ऑस्ट्रेलियामध्ये देखील करोडो लिटर दूध फेकून देण्यात आले... भारतात देखील किरणोत्सर्गबाधित लोणी त्याकाळात आयातीद्वारे पोहोचल्याची नोंद आहे व अर्थातच ते फेकून द्यावे लागले.

**नैसर्गिक आपत्तिमुळे घडलेल्या फुकुशिमा-दायची आण्विक अपघाताचा विध्वंस व भविष्यातही लाखो-हजारो जगभरातल्या लोकांवरची विकृतिची व मृत्यूची टांगती तलवार, याबाबतची सविस्तर माहिती रोजच्यारोज रकाने भरभरून वृत्तपत्रांतून व देशी-विदेशी टी.व्ही. चॅनेल्सवरून पहायला आपल्याला मिळत असल्यानं, त्याबाबतीतलं भाष्य टाळलेल बरं... हातच्या कंकणाला आरसा कशाला? जपानच्या पंतप्रधानांनी ही आण्विकआपत्ति, दुसऱ्या महायुद्धानंतर उद्भवलेलं जपानवरील सर्वात मोठ संकट आहे, असं जे म्हटलयं त्यातच सगळं आलं.**

iii) भारतातील युरेनियम खाणींमधील (जादूगोडा-झारखंड) खनिजात 'युरेनियम ऑक्साईड' चे प्रमाण केवळ ०.०६७ एवढे अत्यल्प असल्याने, एक किलोग्रॅम युरेनियम प्राप्त करताना १७५० किलोग्रॅम टाकाऊ माल तयार होतो. यामुळे हवा, पाणी प्रदूषित होण्याबरोबरच खनिजांची धूळ व बाहेर पडणारा रेडॉन वायू याची खाणकामगारांना बाधा होऊन फुफ्फुसाच्या कर्करोगाचे प्रमाण वाढते. पण पद्धतशीररित्या त्याची कुठलीही नोंद ठेवली जात नाही.

(क) अणूऊर्जा स्वस्त नाहीः अणूविद्युतऊर्जेचा दर मेगावॅटमध्ये काढताना आतापर्यंत अणूसंशोधनावर करण्यात आलेला हजारो कोटी रुपयांचा पाण्यासारखा खर्च (जेव्हा इतर अक्षयऊर्जा स्त्रीतांच्या संशोधन व विकासावर एकत्रितरित्या धड काही शे कोटींचाही खर्च केला गेलेला नाही), युरेनियम खाणींवरील (उत्खनन, वहातूक इ.) प्रचंड खर्च, युरेनियम समृध्दीकरणावरील मोठा खर्च, अणूकचरा साठवणीचा भन्नाट खर्च (यात विल्हेवाट लावण्याच्या खर्चाचा अंतर्भावच नाही, कारण ते तंत्रच अजून जगभरात पूर्ण विकसित झालेले नाही), अणूभट्टयांचे आयुष्य संपल्यावर त्या मोडीत काढण्याचा फार मोठा भांडवली खर्च, तुलनात्मकदृष्ट्या अत्यंत खर्चिक-सुरक्षा व्यवस्था, शत्रूच्या व दहशतवाद्यांच्या संभाव्य हवाई हल्ल्यापासून प्रकल्प संरक्षणासाठी क्षेपणास्त्र तैनातीचा खर्च, विविध सरकारी अनुदाने (उदा. NPCIL ला जडपाणी

वास्तव किंमतीच्या सुमारे ५०% किंमत धरून सरकारतर्फे पुरविले जाते) इ. अनुषंगिक खर्चांच्या बाबांचा मुळीच विचार केलेला नसतो, हे कितपत योग्य आहे?

याव्यतिरिक्त आपत्कालीन वारंवार घेतल्या जाणाऱ्या सुरक्षा तालमींचा खर्च, मासेमारी, फळबागा-शेती व माणसांच्या आरोग्यावर होणाऱ्या विपरित परिणामांची आर्थिक नुकसानभरपाई, (Social Environmental costs) तुलनात्मक विस्थापनाचा प्रचंडखर्च, अणूऊर्जा ही केंद्रिभूतऊर्जा असल्यानं लांबपर्यंत करावयाच्या वीजवहनामुळे (Through National Grid) होणाऱ्या वीजगळतीने मोठ्या प्रमाणावर होणारे आर्थिक नुकसान, संभाव्य अपघातासाठी विमा उतरविण्याच्या खर्चाची फार मोठी तरतूद (प्रत्यक्षात अंगभूत महाप्रलयंकारी धोक्यामुळे अणूप्रकल्पांचा विमा उतरविण्यासाठी कोणतीही विमाकंपनी सहजी तयार होत नाही) या सर्व महाप्रचंड खर्चाच्या बाबीदेखील 'दर मेगावॅट विद्युत दर' काढताना सोयिस्कररित्या वगळल्या जातात. अर्थातच इतर करांच्या रुपाने वा महागाई-वाढीच्या रुपाने (महागाई-हा ही नागरिकांवरील एक प्रकारे कराचा भूर्दंडच आहे.) देशातल्या सगळ्या नागरिकांना हा अनावश्यक भूर्दंड सोसावा लागतो. अशात्ऱ्हेने अणूऊर्जा ही वस्तुत औष्णिकविद्युत वा जलविद्युत यापेक्षाही चौपट-पाचपट महाग असल्यानं, देशा-विदेशातील अणूविद्युत कंपन्यांना कायमस्वरुपी सरकारी आर्थिक पाठबळाचा पांगुळगाडा लागतो (NPCIL व REV या संबंधित दोन्ही कंपन्या सरकारी मालकीच्या आहेत, हा मुद्दा कृपया नीट ध्यानात घ्या!).

(३) सौरऊर्जा, पवनऊर्जा, सागरी लाटा वा बायोमास यापासून निर्माण होऊ शकणारी उदंड विद्युतऊर्जा ही पूर्णत विकेंद्रित स्वरुपाची (Gridless Power) म्हणजेच खऱ्या अर्थानं 'लोकशाहीवादी' असते. मात्र अणूऊर्जा ही कमालीची केंद्रित-स्वरुपाची असल्यानं, ज्या व्यवस्थेतून दमनशक्ति व पिळवणूकीच्या आधारावर राजकीय व आर्थिक सत्ता (Oligarchic-Structure) देशातल्या मोजक्या घराण्यांच्या हातात बेलगाम केंद्रित झालेली आहे, त्याला जैतापूरसारखे अणूप्रकल्प अत्यंत पूरक ठरतात. 'अणू'वादी हे या अर्थानं 'मनू'वादी म्हणायला हवेत की, 'कमीतकमी मात्रेत अफाट ऊर्जा' आणि 'कमीतकमी हाती अफाट आर्थिक व राजकीय सत्ता' ही दोन्ही समीकरणं येथे हातात हात घालून चालतात! म्हणूनच लोकांच्या डोळ्यात धूळ फेकून असे प्रकल्प हटवादीपणे सर्रास राबविण्याचा जोरदार प्रयत्न केला जातोयं. यात कुठेही सर्वसामान्यांच्या भल्याचा-कल्याणाचा विचार असता, तर तारापूरच्या अणूप्रकल्पाच्या आजूबाजूची खेडी उध्वस्त झाली नसती वा अणूप्रकल्पांमधून दीडदमडीचा पगार देऊन बेरोजगारांना अमानुषपणे बेकायदेशीररित्या कंत्राटी-पध्दतीने वर्षानुवर्षे राबवून घेतले गेले नसते! सर्वात आश्चर्याची व खेदाची बाब ही की, खतरनाक अणूविद्युत-प्रकल्प 'आपल्या उशाशी' घेणाऱ्या तारापूर परिसरातील तमाम खेड्यांमध्ये सर्रास विद्युतभारनियमन असते. त्याव्यतिरिक्त पंतप्रधान वा राष्ट्राध्यक्षांसारख्या VVIPच्या तारापूर-अणूप्रकल्प भेटीदरम्यान अन्यायाला वाचा फुटू नये म्हणून व इतरवेळीही या प्रकल्पपिडितांची अमानुष मुस्कटदाबी व कोंडी नेहमी केली जाते.

(४) अणूप्रकल्पासाठी दररोज हजारो कोटी लिटर पाणी समुद्रातून प्रचंड वेगाने खेचून घेऊन प्रकल्पात तप्त झालेले जवळजवळ तेवढेच पाणी पुन्हा भरसमुद्रात किनारपट्टीजवळ सोडले जात असल्यानं (जैतापूर अणूप्रकल्पात दररोज ५२०० कोटी लिटर) त्याभागातील समुद्री पाण्याच तापमान ५-१०$^0$C पर्यंत वाढतं. एवढा प्रचंड पाण्याचा साठा दररोज खेचून परत सोडला जात असल्यानं, तेथील समुद्रकिनारपट्टीच्या जमिनीची प्रचंड धूप होऊन ती खचली जाते. तसेच अणूभट्टीमधून सोडलेल्या गरम किरणोत्सर्गी व विविध रसायने मिसळलेल्या प्रदूषित पाण्यानं 'बायॉलॉजिकल् ऑक्सिजन डिमांड'(B.O.D....) वाढल्यामुळे व सक्शन पाईपाभोवतालच्या जाळयांमुळे माशांची अब्जावधि अंडीपुंजके व पिल्ले नष्ट होतात. त्याचबरोबर जलचरांच्या अन्न साखळीतला पहिला महत्वाचा दुवा असलेले समुद्री शैवाल, पाणवनस्पती, प्रवाळांच्या वसाहती व माशांची अंडी उबविण्याची आश्रयस्थाने मोठया प्रमाणावर उध्वस्त होतात. साहजिकच माशांसारख्या जलचरांवर जगणाऱ्या पक्षी व प्राण्यांची फरपट होते. तद्वतचं मासेमारीवरच अवघं जीवन अवलंबून असणाऱ्या कोळीबांधवांनाही 'मत्स्य-दुष्काळा'ला तोंड द्यायला लागून त्यांचा पिढयापिढयांचा कायमस्वरूपी असलेला 'जीवनाधार' नष्टप्राय होतो! (तारापूर अणूप्रकल्पा लगतची समुद्रकिनारपट्टी पूर्णतया खचली असून तिथला पिढीजात मत्स्यव्यवसाय बुडाल्यात जमा आहे!)

(५) अणूविद्युत प्रकल्पातून सौम्य व मध्यम घातक किरणोत्सारी अणूकचऱ्या सोबतच अत्युच्च तीव्रतेचा, अतिघातक व अंति सर्वनाश करू शकणारा अणूकचरा (ज्यात



जगातील सर्वात विषारी पदार्थ असलेल्या प्ल्यूटोनियम-२३९ चा समावेश असतो. **प्ल्यूटोनियम २,५०,००० वर्षाहूनही अधिक काळ किरणोत्सर्गी राहतोच, शिवाय त्याच्या १ ग्रॅमचा १० लाखावा भाग जरी श्वास घेताना फुप्फुसात गेला तरी फुप्फुसाचा कर्करोग होतो.) अद्यापही अत्यंत घातक किरणोत्सारी अणूकचऱ्याची कायमची सुरक्षितपणे विल्हेवाट लावण्याचा मार्ग वा तंत्रज्ञान किंवा त्याची सुरक्षितरित्या लाखो वर्षे साठवणूकीची भूगर्भीय व्यवस्थाही** (geological repository) **जगात कुठेही शक्य झालेली नाही. 'जगभरातले अणूशास्त्रज्ञ आपल्या खांद्यावरची ही फार मोठया जोखमीची जबाबदारी, चक्क पुढल्या पिढयांवर आजवर ढकलत आलेले आहेत!'**

(६) जगात युरेनियमचा साधारणपणे ५० लाख टन इतकाच मर्यादित साठा असल्याचं 'आंतरराष्ट्रीय अणूऊर्जा समिती'च मत आहे. नवीन युरेनियम साठयांचा शोध लागणं वगैरे खूप आशादायी दृष्टीकोन बाळगूनसुद्धा, हे साठे ३० ते जास्तीत जास्त ४० वर्षात संपुष्टात येतील, असं तज्ञांच मत आहे. त्यातल्या त्यात भारतात युरेनियमचे साठे फार माफक व कमी दर्जेदार आहेत. त्यामुळे परकिय संवर्धित युरेनियम इंधनावर पूर्णत अवलंबून राहून (त्यासाठी अमेरिकेबरोबर नागरी-अणूसहकार्य करार १२३ करून राजकीय स्वायत्तता गहाण टाकण्यात आलेली आहे.) आपला अणूऊर्जा कार्यक्रम किती वर्षे पुढे रेटता येईल, हा मोठा यक्षप्रश्नच आहे.

याबाबत भारतीय अणूशास्त्रज्ञांचं असं प्रतिपादन आहे की, भारतात मोठया प्रमाणावर उपलब्ध असलेल्या (विशेषत केरळात) थोरियम-२३२ चा व्यापारी वापर करण्याचे तंत्रज्ञान अंतिम टप्प्यात आले असून, तसे झाल्यास येत्या किमान ३००० वर्षांची भारताची ऊर्जेची गरज भागविली जाऊ शकते व अणूकचऱ्याची निर्मितीही कमालीची घटू शकते. मात्र हा पूर्णतः भूलभूलैय्या आहे व त्याला अशासाठी भूलभूलैय्या म्हणायचा... कारण, अशात्ऱ्हेचा प्रयत्न फार पूर्वीपासूनच म्हणजे अगदी अणूऊर्जा कार्यक्रमाच्या प्रारंभापासूनच (१९५४) केला जात आहे, परंतु ही प्रक्रिया चार टप्प्यांची आणि प्रचंड गुंतागुंतीची असल्यानं अजुन काही दशके तरी 'थोरियम'चा व्यापारी वापर अपेक्षित नाही. त्यामुळे मूलभूत बाब ही की, प्रथम आपल्या शास्त्रज्ञांनी हे 'थोरियम' व्यापारी वापराचे तंत्रज्ञान सिद्ध करून दाखवावे (कारण अणूशास्त्रज्ञांनी अणूउद्योगाच्या सुरूवातीला जागतिक स्तरावर वेगानं मारा करू शकणाऱ्या 'फास्ट ब्रीडर' तंत्रज्ञानाविषयी कमालीचा आशावाद निर्माण केला होता. 'क्लोज्ड लूप' प्रकारच्या तंत्रज्ञानाचा वापर करून एकदा इंधन म्हणून वापरलं गेलेलं युरेनियम त्याच्यावर प्रक्रिया करून परत परत वापरत राहून युरेनियमच्या मर्यादित स्वरूपाच्या जटिल समस्येवर मात करायची, असा तो 'फंडा' होता. पण हे सगळे यथावकाश 'हवेतलेच इमले' ठरले!) आणि तशी सिद्धता भविष्यात परिपूर्णरित्या पार पडली तरीही इतर अनुषंगिक अडचणींवर व धोक्यांवर, विशेषत किरणोत्सारी अणूकचऱ्याच्या समस्येवर (कारण थोरियम-२३२ तंत्रज्ञानात निर्माण झालेला अणूकचरा आजच्या तुलनेनं कितीही कमी झाला तरी त्याची तीव्रता व दाहकता शेकडो पटींनी वाढलेली असेल, हा मुद्दा मुळीच दुर्लक्षून चालणार नाही, असं तज्ञांच मत आहे) अणूशास्त्रज्ञांना अजून उत्तरं शोधावीच लागतील.... त्यात कसलीही सूट दिली जाऊच शकत नाही!

(७) अणूऊर्जेला पर्याय नाही?... आजचा वीजेचा तुटवडा व भविष्यातील वीजेची वाढीव गरज भागवायची असेल, तर अणूवीजेला पर्याय नाही... हे अत्यंत बेजबाबदार, धादांत खोटे व विनाशाकडे नेणारे प्रतिपादन आहे, हे खालील गोष्टींवरून सहज ध्यानात येईल.

(i) पाश्चात्य देशांमधील अतिथंड हवामान व अतिरेकी चंगळवादी जीवनशैली, याचा विचार करता कुठल्याही प्रकारे सरासरी दरडोई वीजेच्या वापराबाबत त्यांची आपल्याशी तुलना करणे, हा शुद्ध भंपकपणा आहे.

(ii) 'Poverty is a great pollutant!'...असं माजी पंतप्रधान स्व. इंदिरा गांधी म्हणाल्या होत्या. वस्तुतः 'fflence is a, even much, greater pollutant!' अखिल मानवजातीच्या अंतिम व अनंतकाळच्या हितासाठी... जगाची एकूण लोकसंख्या व लोकांची जीवनशैली व त्यासाठी लागणारा एकूण ऊर्जेचा वापर, 'जेवढं आपण निसर्गाकडून घेऊ, तेवढं निसर्गाला परत देऊ,' याच तत्त्वावर करावा लागेल... त्याबाबत कुठलाही आणि कोणालाही 'चॉईस' नाही... अन्यथा याच अनिर्बंध प्रकारे जीवन जगण्यासाठी अखिल मानवजातीला आंतरराष्ट्रीय 'ग्रीन पीस' संघटनेच्या म्हणण्यानुसार किमान ६ पृथ्वीसारख्या ग्रहांची आवश्यकता भासेल.

(iii) **सध्या जगाच्या ऊर्जानिर्मितीपैकी फक्त १ वाटा सौरऊर्जेचा आहे. पण जर पृथ्वीवरच्या फक्त १ भूभागातून जरी आपण सौरऊर्जा मिळवू शकलो, तरी त्यातून अख्ख्या जगाची सध्याची ऊर्जेची भूक पूर्णपणे भागू शकेल, इतकी त्यात क्षमता असल्याचं बोललं जातं. सातत्यानं नवीन संशोधन-नव तंत्रज्ञान, मोठया प्रमाणावर 'विकेंद्रित' वापर यामुळे आज महाग वाटणारी ही अक्षय-ऊर्जा, भविष्यात स्वस्त व मुबलक उपलब्ध होणं सहजशक्य आहे. पाश्चात्य देशात सौरप्रारणे सौम्य असल्यानं व बारमाही नसल्यानं, या अमूल्य-चिरस्थायी ऊर्जेकडे त्यांचं दुर्लक्ष झालं... पण आपल्या देशात वर्षभर सर्वत्र मोठया प्रमाणावर सौरऊर्जा उपलब्ध असल्यानं, खरतरं स्वातंत्र्यप्राप्तिनंतर त्याचीच कास धरायला हवी होती. पण तसा आग्रह धरणाऱ्या प्रा. दा.ध.कोसंबीं सारख्या अणूशास्त्रज्ञांचे अत्यंत पद्धतशीरपणे खच्चीकरण करण्यात आले.** (अणूऊर्जेच्या वापरासंबंधानं मुळात अणूशास्त्रज्ञांमध्येच दोन उभे तट पडलेले आहेत. ज्यांच्या पर्यावरणीय व सहसंवेदना जागृत आहेत, ते अणूऊर्जेवर किंवा अणूशक्तिकेंद्रांच्या भ्रष्ट, धोकादायक व गलथान कारभारावर आसूड ओढत आहेत. मात्र काहींना करियर उध्वस्त होण्याच्या भयास्तव प्रचंड मुस्कटदाबीचा सामना करावा लागतोय. 'चेतन कोठारी' या माहिती अधिकार कार्यकर्त्याने मिळविलेल्या धक्कादायक माहितीनुसार गेल्या १५ वर्षात मुंबईसह देशभरातील अणूसंशोधन व अणूऊर्जा विभागातील २४ ते ५० वयोगटातील तब्बल १९७ अणूशास्त्रज्ञ व कर्मचाऱ्यांनी आत्महत्या केल्यात. शिवाय कर्करोग आणि हृदयविकाराचे १७३३ बळी झालेतं.... हे नेमकं कशाचं द्योतक आहे?)

'कॅलटेक' मधील 'नॅथन लुईस' या जगविख्यात ऊर्जा तज्ञाच्या म्हणण्याप्रमाणे, सूर्यापासून दरवर्षी आपल्याला १२ लाख कोटी कि.वॅ. इतकी ऊर्जा प्राप्त होते, तर वर्ष-२०५० पर्यंत संपूर्ण जगाची ऊर्जेची गरज दरवर्षी २८०० कोटी कि.वॅ. इतकी असू शकेल. या हिशोबानं पृथ्वीवरील एकूण जमिनीच्या फक्त ०.१६% भागावर सौरऊर्जा निर्मिती कस् शकणारी 'सोलर पॅनेल्स्' उभी केली, तरी अवघ्या मानवजातीच्या एकूण ऊर्जेची गरज सहजी भागू शकेल.

(iv) 'पवनऊर्जा' हा दुसरा एक 'वाढता वाढिता वाढे, भेदिले शून्यमंडळा' असा समर्थ ऊर्जापर्याय आहे आणि जगात तो सर्वत्र बऱ्यापैकी सारख्या प्रमाणात उपलब्ध आहे. पंचमहाभूतांपैकी या 'पवन' महाभूताची क्षमता एवढी अफाट आहे की, एका अभ्यासगटाच्या म्हणण्याप्रमाणे अमेरिकेच्या वीजेच्या गरजेच्या तिप्पट वीजपुरवठा करण्यासाठी फक्त रॉकी पर्वत आणि मिसिसिपी नदी यामधील वाऱ्यांचा प्रवाह पुरेसा आहे. म्हणजे 'अनंत हस्ते देता कमलावराने, घेशिल किती बहू दो कराने' अशी अवस्था मानवजातीची होऊ शकते... प्रश्न फक्त ही दडलेली सुप्त क्षमता विद्युतऊर्जेत रूपांतरित करण्यासाठी लागणाऱ्या राजकीय इच्छाशक्तिचा आहे. बरं, यात गतिज ऊर्जेचे थेट पाण्याच्या वाफेसारख्या माध्यमाविना विद्युतऊर्जेत रूपांतरण होणार असल्यानं, तसेच ती मिळविण्यासाठी इतर कुठल्याही इंधनाची गरज भासत नसल्यानं त्यात फारशी गुंतागुंत किंवा कुठलाही अनुषंगिक धोका देखील नाही.

(v) 'बायोमास' किंवा 'बायो-पर्ल्युल' हे टाकाऊ जैविक मालापासून निर्माण केले गेलेले द्रवरुप वा वायूरुप नैसर्गिक इंधन स्वतंत्रपणे किंवा इतर इंधनासोबत विशिष्ट प्रमाणात मिसळून वापरण्याचे प्रमाण जगभरात वाढत चाललेले आहे. भारतासारख्या मोठया क्षेत्रफळाच्या व विपुल सूर्यप्रकाश जवळ जवळ वर्षभर उपलब्ध असलेल्या आपल्या देशात 'जैविक माल' मोठया प्रमाणावर मिळत असला तरी या पर्यायाकडे कितपत वळायचे, त्याचे प्रमाण एकूण त्याचा पर्यावरणावर होणाऱ्या आघाताकडे पाहूनच सुनिश्चित करावे लागेल. जगभरात सध्या 'सागरी लाटां'पासून अक्षय विद्युतऊर्जा मिळविण्याचे नवनवे प्रयोग व मूलभूत संशोधन होत आहे व त्याचं पर्यावरणाशी असलेलं सख्य पाहता, ते निश्चितच स्वागतार्ह आहे.

**इथे एक गोष्ट विशेषत्वाने ध्यानात घेतली पाहिजे की, जागतिक तपमान वाढीचा परिणाम म्हणून यापूर्वीच नमूद केल्याप्रमाणे समुद्री वाऱ्यांचा वेग अदमासे प्रतिवर्षी ०.०५% वाढत चाललेला आहे (गेल्या २५-३० वर्षांत सर्वात वेगवान वाऱ्यांचा वेग अंदाजे १०% वाढलेला आहे) तसेच समुद्री लाटांची उंची ०.०२५ ते ०.०५०% प्रतिवर्षी या चक्रवाढ गतीनं वाढत आहे (उदा. दक्षिण ऑस्ट्रेलियाच्या समुद्र किनारपट्टीवरील सर्वात उंच १% लाटांची उंची पूर्वी ५ मीटर होती, ती आता एक मीटरने वाढून ६ मीटर झालेली आहे). मानवाच्या मर्कट चाळयांमुळे खवळलेल्या या पंचमहाभूतांचा नजिकच्या भविष्यात अखिल मानवजातीला असणारा विध्वंसक धोका सुस्पष्टपणे दिसत असला, तरी क्षणभर 'संकटात संधि' शोधण्याच्या उद्यमशील वफत्तीचा (हवंतर त्याला इष्टापत्ति म्हणूया!) अंगिकार केल्यास एवढचं म्हणता येईल की, पवनऊर्जा व समुद्रीलाटा यापासून विद्युतऊर्जा मिळविण्यास सध्या आदर्श-स्थिती आहे.**

अवघं जीवनचं उध्वस्त होण्याचा कायमस्वरूपी धोका आणि जीवघेणं प्रदूषण निसर्गसंपन्न ''कोकणात'' ...आणि निर्माण होणारी ८०% वीज उर्वरित संपूर्ण देशात(महाराष्ट्रात नव्हे)..... तथाकथित विकासासाठी ऊर्जानिर्मितीच्या नांवाखाली चाललेला, ''मृत्युच्या सौदागरांचो ह्यो कुठलो निर्दय 'खेळ'?... कोकण, आमच्या बापाचो असा, नाय सगळ्या देशाची 'रखेल' !!!''

**...राजन राजे** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

माणसाला लाकडातील 'अग्निचा शोध' लागल्यावर इंधन वापराच्या या पहिल्या टप्प्यापासून 'इंधनाची निर्मिती व वापरा'च्या इतिहासानं अनेक आश्चर्यकारक वळणं घेतलेली आहेत. मुळात कुठल्याही इंधनाचा मानवाच्या विविध गरजा पूर्ण करण्यास ऊर्जानिर्मितीसाठी वापर, म्हणजेच निसर्गातील जैविक बहुविधतेमुळे व चराचराच्या साहचर्यातून निर्माण झालेल्या मानवी आकलनशक्तिच्या पलिकडील गुंतागुंतीच्या पण अत्यंत शिस्तबध्द-नियमबध्द असलेल्या, निसर्गचक्राला उलटे फिरवणे होय (उदा. विश्वातल्या वस्तूंचा कल अव्यवस्थेत (Entropy) राहण्याकडे असतो, हा सर्वसाधारण पदार्थविज्ञानाचा नियम झुगारुन देत, वनस्पती निसर्गातल्या सूर्यप्रकाश, कार्बनडायॉक्साईड व पाणी इ. घटकांशी कमालीच्या गुंतागुंतीची पण अत्यंत शिस्तबध्द जैविक-रासायनिक प्रक्रिया करुन लाकूड व अन्य जैविक माल बनवतात. पण आपण जेव्हा लाकूड जाळतो, तेव्हा आपण ही सगळी गुंतागुंतीची प्रक्रिया मोडीत काढून त्या संपूर्ण जैविक प्रक्रियांची उलथापालथ करतो आणि प्रकाश व उष्णता या रूपाने ऊर्जा मिळवतो.) अशाच एका पुढच्या वळणावर माणसाला खनिज तेलाचा शोध लागला आणि त्याची चिरंतन-अस्तित्व असलेल्या निसर्गचक्रातली लुडबूड-ढवळाढवळ खूपच तीव्र झाली. तसेच त्याची व्याप्ति आणि तीव्रता दिवसेंदिवस भूमितीय श्रेणीनं वाढत गेली. त्यात दुसऱ्या महायुध्दादरम्यान अणूभंजनातून $E=MC_2$ या आईनस्टाईनकफत शास्त्रीय तत्त्वानुसार अफाट ऊर्जा रहस्याची 'अलिबाबाची गुहा' सापडल्यानंतर अणूबॉम्ब ऐवजी 'शांतता-समृद्धीसाठी अणू' अशी फसवी घोषणा देत पाश्चात्य राष्ट्रांनी अणूऊर्जेची कास धरली. १९७३च्या अभूतपूर्व कृत्रिम तेलटंचाईनं तेलाचे भाव चौपट वाढल्यानंतर जपानसारखा देश पूर्णपणे अणूऊर्जेला शरण गेला. मात्र तोपर्यंत अणूऊर्जेतले महासंहारक धोके, पर्यावरणावर होणारे कायमस्वरुपी गंभीर परिणाम व खर्चिक बाबी सामोऱ्या आल्यानं अमेरिकेसारख्या अतिप्रगत राष्ट्रनं १९७३-७५ च्या दरम्यान नवीन अणूभट्टया उभारणीचा नाद सोडून दिला, तो अगदी आजतागायत! ऑस्ट्रेलियासारख्या आधुनिक देशानं तर अशा विघातक अणूऊर्जेला कधि थाराच दिला नाही. फ्रान्स देशाची परिस्थिती मात्र सर्वस्वी भिन्न म्हणजेच सूर्यप्रकाश व अपुरे क्षेत्रफळ तसेच खनिज तेल किंवा कोळसा याची देशांतर्गत वानवा, म्हणून जनमताच्या विर्ध्द जाऊन मोठया प्रमाणावर तेथील सरकारांनी अट्टाहासानं अणूऊर्जेची धोक्याची टांगती तलवार आपल्या देशाच्या डोक्यावर ठेवलीयं.

थ्री माईल आयलंड (१९७९) आणि चेर्नोबिल (१९८६) या एकापाठोपाठ मोठया व इतर असंख्य छोटयामोठया आण्विक अपघातांच्या धक्क्यांतून कसेबसे सावरलेले 'अणूविश्व' फुकुशिमाच्या (२०११) आण्विक अपघातानंतर मात्र पुरतं भुईसपाट झालेलं आहे. नुकताचं जर्मनी व इटलीनं अणूऊर्जेला रामराम ठोकण्याचा निर्णय घेतलेला आहे, तर चीननं वर्ष-२०५० पर्यंत देशभरातील संपूर्ण विद्युतऊर्जेची गरज सौरऊर्जा, पवनऊर्जा, बायोमास इ. अक्षय स्त्रोतांद्वारे मिळविण्याचा निर्धार करुन महत्त्वाकांक्षी अणू-कार्यक्रमाला तत्काळ स्थगिती दिलेली आहे.

अशातऱ्हेनं भूकंपप्रवण व भूकंपग्रस्त 'जपानचं' उदाहरण देऊन भारतात आण्विक कार्यक्रम रेटण्याचा अट्टाहास करणाऱ्यांना 'जपाननं' चांगलाच धडा शिकवलेला असूनही, 'गिरे तो भी टांग उपर' म्हणणाऱ्या आमच्या दळभद्री राज्यकर्त्यांना व संबंधित अणूशास्त्रज्ञांना कायमची जरब बसेल, असा लढा आपल्याला 'जैतापूरच्या' रणांगणावर द्यावा लागेल. **जपानच्या 'फुकुशिमा'चा अणूसंसर्ग जर सातासमुद्रापलिकडे पोहचू शकतो, तर जैतापूरसारख्या जगातल्या सर्वात मोठया अणूभट्टीतला अणूसंसर्ग कुठपर्यंत पोहोचेल, याचा साधा ठोकताळा बांधला तरी ही वस्तुस्थिती आपल्या ध्यानी येईल की, जैतापूर-माडबनवासीय केवळ त्यांच्या स्वतःच्या अस्तित्वासाठी लढून रक्त सांडवत नाहीयेतं, तर ते आपल्या सर्वांसाठी व सर्वांच्यावतीने सुद्धा लढतायतं!**

.... त्यांच्या लढयाच्या यज्ञकुंडात यथाशक्ति आपल्या समिधा अर्पण करणं, हे फक्त कोकणातल्या किंवा महाराष्ट्रातल्याच नव्हे, तर देशातल्या प्रत्येक नागरिकाचं आद्यकर्तव्य आहे!!!

**जय महाराष्ट्र ! जय हिंद !!**

**– *राजन राजे* (अध्यक्षः धर्मराज्य पक्ष)**

# कोकणाचं (नियोजित 'बारसू-सोलगाव' रिफायनरीच्या पार्श्वभूमीवर) काश्मीरशी नातं काय...???

प्रथम एक प्रश्न विचारात घेऊया : काश्मीरमधून ३७० कलम का हटविण्यात आलं?

...याचं खरं उत्तर एकच, ते म्हणजे, ''धनदांडग्या जैन-गुज्जू-मारवाडी-पंजाबी भांडवलदार लोकांना 'पृथ्वीतलावरचा स्वर्ग' असलेला, 'काश्मीर' हवा होता म्हणूनच आणि त्यांचंच तर हे भाजपाई 'भांडवली-सरकार' आहे केंद्रात''!

...त्यांना काश्मीर हवाय; पण, काश्मिरीयत नकोय, काश्मिरी लोकं नकोत''... ज्याप्रकारे अमेरिका, कॅनडातील मूळ आदिवासी (रेड इंडियन्स वगैरे) भूमिपुत्रांचा, गोर्या पाश्चात्य लोकांनी वंशविच्छेद केला; खरंतरं, तसाच या सगळ्या भांडवलदारांना काश्मिरी लोकांचा समूळ काटा काढायचाय... पण, या भारतीय-राज्यघटनेवर आधारित असलेल्या लोकशाहीत, ते त्यांना शक्य होत नाही म्हणून केवळ... अन्यथा, तो ही नरसंहार त्यांच्याकरवी घडवला गेला असता आणि थंड रक्ताच्या या भांडवलदारांनी काश्मीरच्या पांढर्‍याशुभ्र बर्फावर लाल रक्ताची चादर पसरवली असती आणि 'दल लेक'सारखा (Dal Lake) लाल 'रक्ताचा लेक' (Blood Lake) निर्माण केला असता.

...अगदी तस्संच, याच लोकांना आमचं निसर्गसुंदर 'कोकण' हवंय; पण, 'कोकणी बाणा' नकोय, कोकणी लोकं तर अजिबात नकोत. ३७० कलम काढून टाकूनही काश्मीरचा अजून 'भारत' न करता आल्याचं, मोठं शल्य त्यांच्या उरात ठसठसतंय... म्हणूनच जबरदस्तीने, हडेलहप्पीने 'कोकणाचा काश्मीर' करायला, ते सरसावलेत... तेव्हा, सावध व्हा!

...आणि, या त्यांच्या नीच कर्माला पाशवी स्वार्थापोटी साथ कोणाची, तर ती स्थानिक हितसंबंधी 'दलाल-राजकारण्यां'ची (ओळखा पाहू)!

**या सगळ्याच लोकांची एकत्रित गिधाडासारखी दुष्ट-पैशाचिक नजर केव्हाचीच, महाराष्ट्राच्या 'मर्मबंधातली ठेव' असणाऱ्या, कोकणाच्या अमोघ अशा नैसर्गिक-साधनसंपत्तीवर पडलेली आहे. म्हणूनच, बारसू-सोलगाव तेलशुद्धीकरण-प्रकल्प किंवा जैतापूर-अणुप्रकल्पासारख्या विनाशकारी 'विकास-प्रकल्पां'च्या नावाखाली त्यांना, कोकणी माणसांना हाकलून लावून विस्थापित करायचंय, नव्हे तसं केलं जातं आहेच.**

या देशात, गेल्या काही वर्षांत अमानुष आर्थिक-विषमतेचा अक्षरशः कहर माजलाय... अंबानी-अदानीसारख्या शे-दिडशे भांडवलदारांच्या इशाऱ्यावर, हा देश चालवला जातोय आणि त्यामुळेच, गरीब एवढे गरीब होत चाललेत की, कुणीही त्यांना त्यांच्या जमीनजुमल्यासकट कधिही, कसाही खरेदी करु शकतो. हा असाच, दिवसाढवळ्या राजरोस कोकण विकला जातोय, विकला गेलाय... कोकणाची लाल माती, मराठी माणसाच्या मुठीतून-चिमटीतून निसटत चाललीय!

...तेव्हा, जर ही परिस्थिती कोकणी-भूमिपुत्रांसाठी दिवसेंदिवस अशीच अधिकाधिक गंभीर व घातक बनत जाणार असेल... तर, काश्मीरमधून काढलेलं ३७० कलम, या संपूर्ण कोकणात लावा आणि धनदांडग्या परप्रांतीय भांडवलदारांना कोकणात जमीनजुमला खरेदी करायला, नोकरी-व्यवसाय-धंदा-उद्योग करायला बंदी घाला आणि 'विशेष कायदा' (४४व्या घटनादुरुस्तीनुसार 'संपत्ती', हा 'मूलभूत हक्क' नव्हेच) करुन, आजवर कोकणात परप्रांतीय धनदांडग्यांनी विकत घेतलेल्या शेकडो-हजारो हेक्टर जमिनी 'सरकारजमा' करा व तिथे जैववैविध्यपूर्ण सार्वजनिक जंगलं (कोकणातल्या 'देवराई' सारखी) उभारा, ही 'धर्मराज्य पक्षा'ची जाहीर मागणी आहे !!!

***...राजन राजे** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)*

# भारतीय वंशाचे ब्रिटीश पं. ऋषि सुनक आणि 'जय सियाराम'चा उद्घोष...!!!

*('जय श्रीराम' हे मूळ, 'जय सियाराम' या प्रेममय, कारुण्यमय, कुटुंबवत्सल रामाला नाकारणारं व देशात यादवी-युद्धज्वर पसरवू पहाणारं, 'संघ-भाजपा'कृत क्रूर-कृद्ध अविवेकी-संबोधन...)*

भारतीय स्वातंत्र्यदिनी १५ ऑगस्ट-२०२३च्या केंब्रिज विद्यापीठाच्या 'राम-कथा' कार्यक्रमाला ब्रिटनचे पंतप्रधान म्हणून नव्हे; तर, एक 'हिंदू' म्हणून सहभागी झालेले ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक यांच्या, त्या कार्यक्रमाबाबतचे फोटो, व्हिडिओ... 'मोदी-अंधभक्तां'नी आणि भाजपाई 'आयटी-सेल'ने खरंतरं, फार मोठ्याप्रमाणावर 'व्हायरल' करणं अपेक्षित होतं.

पण, तसं घडताना दिसलेलं नाही... कारण, माहित्येय कुणाला??? कारण, तसं जबरदस्तच आहे, 'बात कुछ राज की है'... अंधभक्तांच्या नीबर, जातधर्म-विद्वेषी मनाला व अंतःकरणाला फार फार काही त्यात झोंबणारं आहे, म्हणूनच तर, मित्रांनो, तसं घडलेलं नाही!

**...याचं कारण, ऋषी सुनक यांनी आपल्या भाषणाची सुरुवातच मुळी, 'जय श्रीराम'सारख्या भुवया ताणलेल्या क्रुद्ध, संतप्त वृत्तीच्या 'राम-संबोधना'ने अजिबात न करता... 'जय सियाराम' या वात्सल्यपूर्ण, प्रेमळ, कुटुंबवत्सल आणि संवेदनशील अशा पिढीजात, पारंपरिक राम-संबोधनाने केली... 'संघ-भाजपा'वाल्यांनी जाणिवपूर्वक मुस्लिमांवर मानसिक दबाव, दहशत निर्माण करण्यासाठी रागीट, उग्र स्वरुपाच्या बनवलेल्या या 'जय श्रीराम' संबोधाचा वापर, ब्रिटीश पंतप्रधान ऋषी सुनक यांनी कटाक्षाने टाळला... आणि, ती बाब आता भाजपा-संघवाल्यांसाठी सहन होत नाही आणि सांगता येत नाही, असं अवघड जागीचं दुखणं बनलंय!**

'जय श्रीराम', हे मूळच्या 'जय सियाराम', या रामाच्या प्रेममय, कारुण्यमय, आज्ञाधारक व तत्त्वनिष्ठ प्रतिमेला सरळ सरळ छेद देणारं, हाती 'धनुष्यबाण' घेऊन 'रामबाण' सोडणारं युद्धप्रवण-संबोधनच! लालकृष्ण अडवानींच्या उत्तर भारतातील रथयात्रेच्या आसपास मुद्दामहून, संघ-भाजपातर्फे 'मंडलमय' भारत, 'कमंडलमय' करण्यासाठी... 'जय श्रीराम', हे यादवी-युद्धज्वर पसरवू पहाणारं संबोधन व 'धनुष्यधारी राम' हे चित्र प्रसवलं गेलं होतं. लालकृष्ण अडवाणींच्या 'मंदिर वहीं बनायेंगे' रथयात्रेपूर्वी, या दोन्ही गोष्टी भारतात कुठेही फारशा प्रचलित नव्हत्याच कधि!

आमची 'सीतामाई' किंवा 'सीतामैय्या' आली की, कारुण्य, प्रेम, वात्सल्य आपोआप तिच्या मागोमाग नाजूकसाजूक पावलं टाकीत आलंच समजा; पण, सीतेला जर जाणिवपूर्वक तुम्ही टाळलीत आणि खांद्यावर धनुष्यबाण घेतलेला, सीतेविना एकटा वनवासी 'राम' दाखवलात की, तो प्रातःस्मरणी वंदनीय असलेला ममत्वाने भरलेला कुटुंबवत्सल, एकवचनी आदर्शवत राम, 'मुळचा खराखुरा जाज्वल्य राम' शिल्लक न रहाता, संघ-भाजपाई ब्रॅण्डचा मुरलेला प्रचारक-संहारक बनलाच म्हणून समजा! आपल्या ढोंगी, बेगडी, बनावट 'हिंदुत्वा'आडचे... पाशवी राजकीय हेतू साध्य करण्यासाठी, एकप्रकारे 'कृपाळू देवाला, हिंसक दानवसदृश्य पेशकश' करण्याची, ही घृणास्पद संघीय चाल व तिरस्करणीय भाजपाई धडपडच होय!

**माझे आजोबा अष्टौप्रहर रामाच्या व कृष्णाच्या भक्तित रंगलेले, तल्लीन झालेले एक सच्चे 'रामकृष्ण-भक्त' होते... आजोबा सांगायचे, राम हा विष्णुचा 'पूर्णावतार' तर कृष्ण, हा विष्णुचा 'परिपूर्ण अथवा संपूर्ण' अवतार... रामाच्या व्यक्तित्वात काही दोष आपल्याला उघड दिसतात; पण, कृष्णाच्या व्यक्तित्वात, व्यवहारात तसा दोषपूर्ण लवलेशही कुठे आढळत नाही...** म्हणून, 'अपूर्ण' अथवा दोषपूर्ण रामाला सहसा एकटा दाखवला जात नाही, ती 'अपूर्णता' भरुन काढण्यासाठी कायम तो लक्ष्मण, सीता व हनुमानासमवेतच दाखवला जातो. पण, विष्णुचा 'परिपूर्ण' अवतार असलेला कृष्ण मात्र, त्याच्या 'स्वयंभू पूर्णत्वा'ने एकटा दाखवण्याची पूर्ण मुभा आहे, तसा तो अनेकदा हाती 'सुदर्शन चक्र' घेऊन 'परित्राणाय साधुनाम्, विनाशायच दुष्कृताम्' अशा 'दुष्ट-दुर्जनांच्या संहारासाठी युद्धसज्ज असलेल्या प्रलयंकारी आविर्भावात दाखवलाही जातो... आणि, म्हणूनच गोकुळातला मुरलीवर मधुर संगीत वाजवून राधेला भुरळ घालणारा 'कृष्ण', हा तसा संगीतप्रेमी न रहाता, महाभारतातला 'युद्धसंगीत' छेडणारा 'श्रीकृष्ण' बनतो...!!!

...असो, अयोध्येला 'राममंदिर' वगैरे बांधून रामाच्या नावावर फक्त, 'मतां'चा जोगवा' मागणारे; पण, प्रत्यक्षात जनकल्याणकारी 'रामराज्या'ऐवजी... अस्मानाला भिडलेली महागाई, बेरोजगारी-अर्धरोजगारी, बेलगाम खाजगीकरण, ढासळती अर्थव्यवस्था व भांडवली-व्यवस्थेचा दमनकारी उत्पात लपवण्यासाठी दंगलप्रवण धार्मिक-उन्मादाचं 'रावणराज्य' उभं करणाऱ्या 'लुच्च्या' 'रामभक्तां'ची, हिंदीतल्या 'जय सियाराम' किंवा मराठीतल्या 'जय सीताराम' ऐवजी, 'जय श्रीराम' ही घोषणा, म्हणजे एक फसवी राजकीय चाल आहे, बस्स... त्यात, जातिवंत 'भावभक्ति' आपल्याला कुठे अभावानेच आढळेल... धन्यवाद!

***...राजन राजे** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)*

# शिवबा-संतांचं जाज्वल्य 'हिंदुत्व' ते भाजपाई बोगस-बनावट-बेगडी 'हिंदुत्व'...!!!

## (महाकाय धरणे, ही आधुनिक भारताची मंदिरे नव्हेत; तर, महाकायतेचा महारोग... पं. नेहरुंना झालेली उपरती!)

**'संत निगमानंदजीं' पाठोपाठ, 'संत ज्ञान स्वरुप सानंद' यांनी 'गंगामैय्ये'च्या रक्षणासाठी नुकतीच प्राणांची आहुती दिली... त्यानंतर, 'संत गोपालदास', (वय वर्ष अवघं ३६ वर्षे) ऐन तारुण्यात गंगामातेसाठी प्राण अर्पण करायला सिद्ध झाले... त्यांची दिव्य-तेजस्वी प्राणज्योत मालवायला, आता काळाच्या फक्त एका हलक्या फुंकरीची गरज तेवढीच उरलीय... ती ही 'गरज', येत्या काही दिवसात, या देशातल्या ''रक्त-पिपासू शोषक व्यवस्थे''कडून (Vampire State System) आणि डोळ्यावर कातडं ओढून, कानात बोळे घालून बसलेल्या..... या देशातल्या, 'जातधर्मा'त आणि 'चंगळवादी-जीवनशैली'त अडकून पडलेल्या, स्वार्थी-बेजबाबदार भारतीय जनतेकडून भागवली जाईलच !!!**

**२४ जून-२०१८ मध्ये उपोषणाला बसलेल्या 'संत गोपालदासां'ना या आठवड्यात दोनचार दिवसांच्या अंतराने, दुसऱ्यांदा एम्स (IIMS) इस्पितळात हलविण्यात आलेलं होतं. गेले काही दिवस, गंगेच्या रक्षणासाठी सर्व उपाय थकल्यावर, अखेरीस परमेश्वरालाच साकडं घालण्यासाठी, पाण्याचाही त्याग करत, अनंताच्या प्रवास करायला 'संत गोपालदास' सिद्ध झाले!**

त्यापाठोपाठ, 'संत शिवदासजी' आणि त्यानंतर, भरतभूमितल्या अशा अनेक जातिवंत आणि जाज्वल्य संतांनी प्राणार्पण करण्याची तयारी केलीय. परिस्थिती एवढी गंभीर आहे की, कधिकाळी भूलोकीची पवित्रभूमि मानल्या गेलेल्या या भरतभूमिला, या संतांच्या अतिशय 'पावन-पवित्र रक्ता'चीच जणू तहान लागलीय, असं विदारक चित्र या देशात निर्माण झालेलं दिसतय.... नेमके आपण, कुठल्या दर्जाचे आणि लायकीचे 'नागरिक' आहोत? आपण, नक्की 'नागरिक'च आहोत (कारण, 'नागरिक' या संकल्पनेत, काही किमान पातळीवरची संवेदना आणि सुसंस्कृतता गृहित धरलेली असते) की, 'जातधर्मा'च्या नांवाने शिमगा करत इतरांचं व निसर्गाचं शक्य होईल तेवढं, जळवेसारखं आकण्ठ-निर्मम शोषण करत जगणाऱ्या 'रानटी जमाती' आहोत?? अहो, रानटी जमातीसुद्धा आपल्यापेक्षा एका बाबतीत अधिक भल्या व सुसंस्कृत म्हणायला हव्यात. त्या जमाती, ज्याच्या जीवावर आपण जगतो, त्या निसर्गाला पूजतात... मग, त्याच्या मुळावर उठण्याची गोष्ट त्यांच्या हातून कालत्रयी घडू शकेल? काल-परवापर्यंतची आपली मराठी-संस्कृतीही अशीच 'निसर्गपूजक' होती.... पण, 'विकासा'चं व्यसन जडलं आणि इतरांचं अंधानुकरण करत मौजमस्तीच्या नादात आम्हीही पुरते बिघडलो.... आमच्याच अस्तित्वाच्या मुळावर उठलो! आधुनिकतेचे आणि बुद्धीवादाचे दांभिक व आपमतलबी मुखवटे धारण करत, आम्ही राजरोस निसर्गाला ओरबाडत जगतो... पर्यावरणाचा समतोल उध्वस्त करत भावी पिढ्यांचं अस्तित्व धोक्यात टाकणारे 'विकासा'चे अल्पजिवी फायदे उपटत रहातो... मग, सवड काढून कुठली तरी प्रार्थनास्थळं गाठतो (मंदिर, मस्जिद, चर्च, गुरुद्वारा, बुद्धविहार), नाहीतर कुठल्यातरी बनावट, संत-सद्‌गुरु-बाबाजी-स्वामींच्या कळपात सामील होतो आणि स्वत:ला 'धार्मिक' म्हणवून घेण्यात धन्यता मानतो (कदाचित, जर कुणाची निसर्गाप्रति, प्राणीमात्रांप्रति थोडी कुठे 'संवेदना' शिल्लक असलीच, तर त्यातून आतून जाणवत असलेली 'अपराधीपणा'ची बोच थोडी सौम्य होत असावी).

या देशातली खरीखुरी ''आध्यामिक जाणिव'' नुसतीच क्षीण होत चाललीय असं नव्हे; तर, नाहीशी होण्याच्या मार्गावर आहे! या विनाशकारी 'विकास-प्रक्रिये'त, ''जनसंख्या आणि जीवनशैली'' च्या विस्तारण्याने (खरंतरं, विस्फोटानं)... ''जल, जंगल, जमीन'' आम्ही बुद्धीवादी अहंकाराने नासवत-उध्वस्त करत चाललोय. 'तंत्रज्ञाना'ला, आम्ही 'ब्रह्मज्ञान' समजण्याची घोडचूक करुन बसलोय.... तंत्रज्ञानाचा आधार घेत आम्हीच, आता जणू या ब्रह्मांडाचे ''ब्रह्मा, विष्णू, महेश'' बनू पहातोय! **तंत्रज्ञानातून उद्भवू शकलेल्या समस्या, तंत्रज्ञानानेच सहजी दूर करता येतील, या मस्तीने आपण ''निसर्गाशी द्यूत खेळतो आहोत.... त्यातूनच, गंगानदीवरचे अनेक ठिकाणचे भलेमोठे जलविद्युत-प्रकल्प काय किंवा कोकणातल्या जैतापूरसारखे महाकाय अणुविद्युत-प्रकल्प काय, नाणारचा महाकाय तेलशुद्धीकरण-प्रकल्प काय.... असे सगळे तथाकथित विकास-प्रकल्प अस्तित्वात येत जातात... जे अंति, महासंहारक विनाश घडवणार आहेतच. म. गांधी आणि जे. सी. कुमारअप्पांसारखे त्यांचे शिष्य, १० हेक्टरपेक्षा मोठं धरण, असताच कामा नये, असे सातत्याने प्रतिपादन करायचे. ''मोठी धरणे, ही आधुनिक भारताची मंदिरे होतं'', असं म्हणणाऱ्या भारताचे पहिले पं. नेहरूंचंही मत कारकीर्दीच्या उत्तरार्धात बदललं होतं. त्याकाळी, मोठ्या धरणांविरुद्ध कुठलीही जनआंदोलनं उभी राहीली नसताना, केवळ उद्भवलेली भीषण परिस्थिती पाहूनच पं. नेहरूंनी मोठं मन दाखवतं, आपलं मत बदललं होतं (कारण, पं. नेहरू हे अतिशय ज्ञानी, तरल व संवेदनशील पंतप्रधान होते... नरेंद्र मोदींसारखे संवेदनाशून्य नव्हते).** नोव्हेंबर-१९५८ मध्ये केंद्रीय पाटबंधारे व जल महामंडळासमोर, ''छोट्यामोठ्या प्रकल्पांचे होणारे सामाजिक परिणाम'', या विषयावर भाषण करताना.... पं. नेहरूंनी, मोठ्या धरणांसारख्या महाकाय प्रकल्पांना, स्वत:च उभारलेल्या ''मंदिरांच्या मखमाली सजावटी''तून ओढून बाहेर काढत, थेट ''अवाढव्यतेचा महारोग'' असं विषादपूर्ण व अर्थपूर्ण संबोधनं दिलं होतं! भाषणात पुढे जात, ''हा, विकासाची कास धरणाऱ्या भारतातला अत्यंत धोकादायक विचारप्रवाह'' असल्याचंही त्यांनी अधोरेखित केलं होतं.... पण, या अशा अतिशय विचारगर्भ व महत्त्वपूर्ण बाबी आमच्यासमोर कधिचं मांडल्या जात नाहीत (संदर्भ: Nehru Memorial Museum and Library-1988).

**आमची मोठी धरणं, आजवरचे मोठे जलविद्युत-प्रकल्प, उरल्यासुरल्या जंगलांच्या जमिनीची प्रचंड धूप होऊन त्यात साठलेल्या अफाट गाळामुळे, आता आमच्या मार्गातली मोठी धोंड ठरु लागलीयत. तरीही, आम्ही मागे वळून पहायला, थबकायला तयार नाही.... संत निगमानंद, संत ज्ञान स्वरुप सानंद, संत गोपालदास, संत शिवदास यासारखी जाज्वल्य संतमंडळी तसेच, जागतिक पर्यावरणतज्ज्ञ केव्हाचेच इशारे देत आलेत; पण, आम्ही बहिरे-आंधळे झालेले आहोत.** आता तर, 'संतमंडळी' जगाच्या कल्याणासाठी 'प्राणार्पण'ही करु लागलीत.... तरी आमचं अंधत्व दूर व्हायला तयार नाही, बहिरेपण संपायचं नांव घेत नाही!

तरीही, केरळातल्या 'शबरीमला' देवस्थानात महिलांच्या प्रवेशावरुन निरर्थक चर्चा झडत रहातात, महाराष्ट्रात 'धर्माचे अधिकारी' नव्हे; तर, डँबिस राजकारण्यांच्या हातात हात घालून बसलेल्या 'धर्माचे ठेकेदार' बनलेल्यांकडून संत रामदासांच्या नांवाने दंड'बैठका' काढल्या जातायत, कुणी 'मोहनदास करमचंद गांधी' नांवाच्या जाज्वल्य 'बापू'ला दूर सारत बेगडी 'बापू'ला जवळ करतायत.... 'रामनाम' चोपडीत लिहीत (अंत:करणात रामाला न रुजवता) व्यर्थ आयुष्य खर्ची घालतायतं, साईबाबांचे अवतार म्हणवणाऱ्यांचे संप्रदाय गडगंज संपत्ती धारणकर्ते बनून जातायत... ''शिमगा संपला तरी कवित्व संपत नाही'', तसं संप्रदाय उभारणारा सरला तरी संप्रदाय, व्यवस्थेची ढाल हाती घेत, पुढे चाल करत रहातात..... या कुणाकुणालाही, खऱ्याखुऱ्या धार्मिकतेशी काहीही देणंघेणं नसतं! असते फक्त, सत्ता-संपत्तीकांक्षा (जी, राजकारण्यांशी जवळीक साधली की, आपसूकच लाभत रहाते आणि राजकारण्यांना त्यातून लाभतात हुकमी मतं) आणि बसल्या जागी धार्मिकतेच्या 'दुकानदारी'ची कांक्षा! योग-प्राणायामाचा बाजार भरवत शेकडो नव्हे; सहस्त्र कोटींची संपत्ती उभारणारे, यमुनेच्या तीरावरचा निसर्ग बिनदिक्कत उध्वस्त करणारे.... 'संत' म्हणवून घेण्याच्या किंचितसे तरी योग्यतेचे असू शकतात काय? फारतर, त्यांना यशस्वी उद्योगपती वा व्यावसायिक म्हणू शकतो आपण!

**खरीखुरी 'धार्मिकता' आणि आजचा सजीवसृष्टीच्या मुळावर उठलेला 'विकास' व तो 'विकास' घडवणारी ही आजची आधुनिक 'व्यवस्था'.... हातात हात घालून, एक पाऊल तरी सोबत चालू शकेल ??? एवढी साधी बाब, आपल्याला समजून घेणं अवघड जात असावं? ...की, आपण साऱ्यांनीच आपल्या आजच्या आधुनिक सोयिसवलतींसाठी झोपेचं सोंग कायमच धारण करायचं ठरवलय?**

**आपल्या सगळ्या धर्मग्रंथात आंतरिक विकासावर भाष्य आहे, असल्या विनाशकारी बाहेरच्या 'विकासा'वर नव्हे! माणसाकडून... नियतीला, परमात्म्याला सजीवसृष्टीची काळजी घेण्याची अपेक्षा असणार की, अवघ्या सजीवसृष्टीचीच थडगी रचून मोजक्याच पिढ्यांनी ऐशोआराम करत बेगुमानपणे व निर्दयतेनं सगळं संपविण्याची?**

विविध धर्मसंप्रदायींच्या तोंडातून, वरपांगीसुद्धा, गंगाकिनारीचे आमचे जाज्वल्य संत, गंगेसाठीच प्राणार्पण करत असताना चकार शब्द बाहेर पडू नये.... त्यातच, या संप्रदायांचं, 'व्यवस्थे'शी 'हातमिळवणी' असल्याचं व्यवच्छेदक लक्षण स्पष्ट दिसतय. या सगळ्या संप्रदायांची काय औकात की, ते या ''रक्त-पिपासू शोषक व्यवस्थे''शी (Vampire State System) पंगा घेतील??? ....जी, आज खऱ्याअर्थाने, तातडीची आणि नितांत अशी काळाची गरज बनलेली आहे! कुणी एक भारतातलं 'ईशा' नांवाचं फाऊंडेशन, निघालयं भारतातल्या नद्या साफ-स्वच्छ करायला! कुणाच्या पैशानं,

कुणाच्या प्रचंड आर्थिक पाठबळावर? . ..तर, रिलायन्ससारख्या अनेक रासायनिक व कार्बन प्रदूषण करणाऱ्या कंपन्यांच्या आर्थिक सहयोगातूनच! ज्यांनी नद्या, समुद्र, तलाव, विहीरी नासवल्या, गडगंज नफा कमावण्याच्या राक्षसी लालसेतून आरपार प्रदूषित केल्या, त्याचं कंपन्या आता.... ''सौ चूहे खाके, बिल्ली चली हाज को'', असा फसवा-गोंडस मुखवटा धारण करत आमच्या नद्या स्वच्छ करणार? त्यांच्याकडून केलं जाणारं 'जलप्रदूषण', कार्बन-प्रदूषण कारखाने चालू ठेऊन थांबू शकतं कधि?? कुणाला गंडवताय, उल्लू बनवताय आणि कितीकाळ बनवू शकणार आहात??? ... सरतेशेवटी, नियती तुम्हालाआम्हाला सगळ्यांनाच अवचित गाठणार आहे सर्वनाशाच्या खिंडीत!!!

मित्रहो, ...या औद्योगिकीकरणातून, आधुनिक चंगळवादी जीवनशैलीतून व अर्थव्यवस्थेतून रचले जाणारे, हे शोषण आणि प्रदूषणाच्या पातकांचे इमले, आपल्यालाच गाडण्याएवढे भलेमोठे झालेत.... ते कधि कोसळतील, आपल्याला खाली दडपून टाकीत आपला श्वास कायमचा रोखतील, याचा काही नेम नाही... हा, फक्त आता काही दशकांचाच खेळ उरलाय.

स्वामी निगमानंद, स्वामी ज्ञान स्वरुप सानंद... या पुण्यात्म्यांच्या महान बलिदानाचा हा इशारा, फक्त नरेंद्र मोदींच्या नृशंस प्रशासनालाच नाही.... तर, अवघ्या विश्वाला आहे!!!

***......राजन राजे***

**(अध्यक्ष: धर्मराज्य पक्ष.... भारतातील पहिलावहिला निसर्ग-पर्यावरणवादी हरित पक्ष)**

***माणूस जोवर शेतात राबत असतो, तोवर तो इतर सजीवांसारखाच निसर्गाशी तादात्म्य राखलेला एक 'प्राणी' असतो... पण, शहरं उभारली व मग, शहरात आला की, तो महत्त्वाकांक्षाग्रस्त 'राक्षस' बनतो!***

*...शेतात, तो मनुष्यप्राणी या अर्थाने असतो की, प्राणी-पक्षी-कीटक-जलचरांप्रमाणेच तो स्वतःचं अन्न स्वतः मिळवतो, शोधतो. तो शहरात आला की मात्र, 'भांडवली-व्यवस्थे'तील कंपन्या-कॉर्पोरेट्समध्ये नोकरी करतो आणि नोकरी करुनच इतरांच्या जीवावर जगू पहातो, जो पूर्णतया निसर्गाविरुद्धचा व्यवहार असतो!*

*आपली जननी असलेली ही पृथ्वीमाता... ना उद्योग करण्यासाठी, ना नोकरी देण्यासाठी, ना तुमच्या कुठल्या महत्त्वाकांक्षा जोपासण्यासाठी आहे... ती आहे फक्त, बहुढंगी, बहुरंगी जीवन तिच्या अंगाखांद्यावर फुलवण्यासाठीच केवळ! त्या नैसर्गिक जगण्यातला सहजगत्या मिळणारा आस्वाद-आनंद घ्यायचा सोडून... कुठल्या न् कुठल्या महत्त्वाकांक्षेने प्रेरित होऊन अवघं जगणंच, आपलं आपणच एक रणांगण बनवायचं आणि रोग-व्याधिग्रस्त होत, पिढी-दरपिढी विनाशाची वाटचाल करायची...???*

***...राजन राजे***

**(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष... भारतातील पहिलावहिला निसर्ग-पर्यावरणस्नेही 'हरित-पक्ष'...** The First 'Green-Political Party' of India)



*भारतीय स्वातंत्र्याचा ७६वा वर्धापनदिन, शिवसेना चंदनवाडी शाखेच्यावतीने, १४ ऑगस्ट-२०२३च्या मध्यरात्री मोठ्या उत्साही वातावरणात संपन्न झाला. ठीक १२ वाजून ०१ मिनिटांनी, ठाण्याचे माजी पोलीस आयुक्त के.पी. रघुवंशी यांच्या हस्ते, ध्वजारोहण करण्यात आले. स्वातंत्र्यदिनाच्या या कार्यक्रमाला, 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष राजन राजे, यांची प्रमुख पाहुणे म्हणून विशेष उपस्थिती होती. याप्रसंगी त्यांच्या हस्ते लष्करात कर्तृत्व गाजवणाऱ्या निवृत्त सैनिकांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे ठाणे लोकसभा खासदार मा. राजन विचारे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या कार्यक्रमात, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे ठाणे जिल्हाध्यक्ष श्री. केदार दिघे, जिल्हा समन्वयक श्री. मधुकर देशमुख, ठाणे शहरप्रमुख श्री. प्रदीप शिंदे, 'धर्मराज्य पक्षा'चे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष महेशसिंग ठाकूर आणि पक्षाचे कार्यकर्ते श्री. संजय दळवी आदी मान्यवरांसह, शेकडो महिला आणि पुरुष शिवसैनिक कार्यकर्ते-पदाधिकारी व स्थानिक नागरिक मोठ्यासंख्येने उपस्थित होते.*



*रायगड जिल्ह्यातील तळोजा एमआयडीसी येथील, जॉन्सन मॅथ्ये (इं) प्रा. लि. या कंपनीतील, 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'च्या कामगार सदस्यांनी, अध्यक्ष मा. राजन राजे यांची, मंगळवार, दि. ८ ऑगस्ट-२०२३ रोजी, ठाणे कार्यालयात सदिच्छा भेट घेतली. दरम्यान, गेल्यावर्षी यशस्वीपणे पार पडलेल्या ९,३०० रुपयांच्या पगारवाढीच्या कराराला, एक वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने, 'जॉन्सन मॅथ्ये'च्या कामगार सदस्यांनी, 'धर्मराज्य' नाव असलेले टी-शर्ट, मा. राजन राजे आणि महासंघाचे महासचिव श्री. महेशसिंग ठाकूर यांना भेट म्हणून दिले. यावेळी युनिट अध्यक्ष श्री. हनुमंत हातमोडे, उपाध्यक्ष श्री. प्रितेश पाटील, सचिव श्री. भीमराव मेहेत्रे, खजिनदार श्री. भूषण पानसकर आणि सदस्य श्री. यतीन पाटील व श्री. सागर शेलार उपस्थित होते.*

**'धर्मराज्य पक्षाध्यक्ष' राजन राजे प्रस्तुत**

# 'शिवकालीन वतन व्यवस्था'

*'धर्मराज्य पक्षाध्यक्ष' राजन राजे प्रस्तुत, प्रख्यात शिवव्याख्याते किमंतु ओंबळे-सरकार यांनी सादर केलेल्या, शिवकाल या सदराखालील, 'शिवकालीन वतन व्यवस्था' याबाबत, अत्यंत महत्त्वपूर्ण व सर्वसामान्यांच्या ज्ञानात भर घालणारी आणि सर्वसामान्यांना ज्ञात नसलेली, अभ्यासपूर्ण अशी व्हिडिओ-मालिका यूट्यूबवर सुरु करण्यात आलेली आहे. ही व्हिडिओ-मालिका पाहण्यासाठी, आपण खाली दिलेल्या लिंकवर क्लिक करुन, सदर व्हिडिओ-मालिका पाहू शकता. या व्हिडिओ-मालिकेचा सर्वदूर प्रसार करण्यासाठी, सदर व्हिडिओ-लिंक जास्तीतजास्त प्रमाणात व्हॉट्सअॅप व फेसबुकवर लाईक व शेअर करावी*





*प्रस्तुतकर्ता*
*राजन राजे*
*(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)*



*शिवव्याख्याते*
*किमंतु ओंबळे-सरकार*

youtube.com/@KimantuLive




राष्ट्रीय पातळीवरील, डाव्या विचारसरणीचे राजकीय नेते मा. कॉ. दीपंकर भट्टाचार्य (महासचिव, CPI, ML) यांनी मंगळवार, दि. २९ ऑगस्ट-२०२३ रोजी 'धर्मराज्य पक्षा'च्या कार्यालयास सदिच्छा भेट दिली. INDIA आघाडीच्या बैठकीच्या निमित्ताने कॉ. दीपंकर भट्टाचार्य हे, दोन दिवसांच्या मुंबई भेटीवर आहेत, त्या पार्श्वभूमीवर त्यांनी 'धर्मराज्य पक्ष' कार्यालयाला येऊन 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष मा. राजन राजे यांची आवर्जून भेट घेत, त्यांच्याशी अनेक राजकीय आणि सामाजिक विषयांवर प्रदीर्घ चर्चा केली. यावेळी, ज्येष्ठ पत्रकार आणि काँग्रेसचे राज्यसभेतील खासदार मा. श्री. कुमार केतकर, शिवसेनेचे ठाणे लोकसभा खासदार मा. श्री. राजन विचारे, ज्येष्ठ बँकिंग तज्ज्ञ मा. श्री. विश्वास उटगी, ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. के. आय. किल्लेदार, CPI MLचे महाराष्ट्राचे प्रमुख व पॉलिट-ब्युरो सभासद कॉ. प्रभात कुमार, CPI MLचे महाराष्ट्र-सचिव व केंद्रिय-समिती सभासद कॉ. शाम गोहिल व CPI MLच्या संपादकीय-मंडळाचे सभासद कॉ. अजित पाटील यांची चर्चेत भाग घेतला. तसेच, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे ठाणे लोकसभा संपर्कप्रमुख मा. श्री. मधुकर देशमुख, ठाणे उप-जिल्हाप्रमुख मा. श्री. कृष्णकुमार कोळी, ठाणे युवा संघटक मा. श्री. अर्जुनसिंग डाभी, नौपाडा विभागप्रमुख मा. श्री. प्रकाश पायरे, पर्यावरणवादी कार्यकर्ते मा. श्री. राजेंद्र फातर्पेकर आदी मान्यवर मंडळी उपस्थित होती. या प्रदीर्घ विचारमंथनादरम्यान, आगामी लोकसभा निवडणुकांसंदर्भात, देशातील प्रत्येक राजकीय परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. यामध्ये देशातील वाढती महागाई, बेरोजगारी, जातीय व धार्मिकवाद, मणिपूर हिंसाचार आणि महत्त्वाचे म्हणजे, **खासगीकरणाच्या माध्यमातून आलेली नव-अस्पृश्यता नावाची कंत्राटी-कामगारपद्धतीची गुलामगिरी, या अतिशय संवेदनशील मुद्द्यांवर 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष मा. राजन राजे यांनी आपली परखड मते मांडली.**

दरम्यान, उपस्थित मान्यवर बंगालमधील डाव्या मंडळींसाठी खास मराठमोळ्या पद्धतीच्या अल्पोपहाराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पुरणपोळी, बटाटावडा, थालीपीठ आदींचा समावेश करण्यात आला होता. विचार-मंथनाचा हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी, 'धर्मराज्य पक्षा'चे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष व धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघाचे महासचिव श्री. महेशसिंग ठाकूर, महासंघाचे उपाध्यक्ष श्री. रमाकांत नेवरेकर, ठाणे लोकसभा अध्यक्ष श्री. राजेश गडकर, ठाणे लोकसभा उपाध्यक्ष श्री. नरेंद्र पंडित, ठाणे लोकसभा सचिव श्री. विनोद मोरे, ठाणे विधानसभा अध्यक्ष श्री. जगन्नाथ सलगर, 'धर्मराज्य पक्षा'चे खजिनदार श्री. जयेंद्र जोग, ठाणे शहर संघटक श्री. अजय जया आदी पदाधिकाऱ्यांसह, श्री. संजय दळवी, श्री. सोपान चौधरी, श्री. निलेश सावंत, श्री. अविनाश सावंत, श्री. शंकर केसरकर, श्री. सिद्धेश सावंत-भोसले, श्री. वैभव गुरव, श्री. नितीन वायदंडे, सौ. मनीषा सांडभोर, सौ. भावना ओरपे आदी कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. या विचारमंथनाचे पडसाद, फार दूरवर उमटतील आणि जनसामान्यांच्या, विशेषत: महाराष्ट्रातील मराठी कामगारांच्या हिताचे असतील! असे उद्गार 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष मा. राजन राजे यांनी यावेळी काढले.




मोदी-शाहांच्या भाजपाई केंद्र सरकारपुरस्कृत, येऊ घातलेल्या कामगारविरोधी काळ्या कायद्यांपासून आणि नव-अस्पृश्यता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कंत्राटी-कामगारपद्धतीच्या गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी, मुजोर कंपनी व्यवस्थापन व प्रस्थापित राजकीय व्यवस्थेशी सनदशीरमार्गाने संघर्ष करुया...

'धर्मराज्य पक्ष'प्रणित
'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ'
या कामगार संघटनेत सामील व्हा !!!







राजन राजे
(अध्यक्ष)

महेशसिंग ठाकूर
(महासचिव)
९७६९५ २५००६

रमाकांत नेवरेकर
(उपाध्यक्ष)
७२०८८ ७९१९७

कार्यालयीन पत्ता : तळमजला, रविदर्शन बिल्डिंग, डॉ. बेडेकर हॉस्पिटलजवळ, राममारुती क्रॉस रोड, डीएनएस बँकेच्या मागे, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२. संपर्क क्र. ७७७७०६९५३०


Printed, Published and Owned by **Rajan Raghunath Raje Printed** at, **Siddhakala Print Media and Publications Pvt. Ltd.**, Plot No. W 230, T.T.C. Industrial Area, Khairne, Navi Mumbai, Dist -Thane, Pin Code -400710 and Published from Shubharambha, Phase - 1 Building No. 7, Room No. 601 - 602, Kokani Pada Marg, Off. Ghodbunder Road, Manpada, Thane [West], Apna Bazar S.O, Dist - Thane, Pin Code - 400610, Maharashtra. Editor : **Maheshsingh Narayansingh Thakur (97695 25006)** (TITLE CODE : MAHMAR52590)